रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २४३ ॥ पृष्ठे ८+४
www.krushival.in

अलिबाग तालुक्यातील
शेकापमुळेच विकासकामे



पान ३ वर

# कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹

## रखडलेल्या अलिबाग-रामराज-रोहा रस्त्यासाठी
# शेकापचा हल्लाबोल

*। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।*

*शेकापपक्षाच्या रास्ता रोका आंदोलनामुळे सुरु झालेले अलिबाग-रामराज-रोहा रस्त्याचे काम पुन्हा एकदा रखडल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला आहे. रखडलेले काम त्वरित सुरु करण्याच्या मागणीसाठी शेकापपक्षाच्या महिला आघाडीप्रमुख नगरसेविका चित्रलेखा पाटील आणि तालुका चिटणीस अनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर हल्लाबोल केला. जर तातडीने हे रखडलेले काम सुरु करण्यात आले नाही, तर शेकापपक्षाच्या वतीने उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.* पान ५ वर



*शेकापपक्षाच्या प्रयत्नाने सुरु झालेले काम अधिकारी आणि कंत्राटदाराच्या चालढकलपणामुळे रखडले आहे. त्यामुळे या मार्गावरुन प्रवास करणाऱ्यांचे अतोनात हाल होत आहेत. रखडलेले काम तातडीने पुन्हा सुरु न केल्यास पक्षातर्फे उग्र आंदोलन छेडण्यात येईल.*
*– चित्रलेखा पाटील, शेकाप महिला आघाडीप्रमुख*


अलिबाग-रोहा रस्त्याचे सुरु करण्यात आलेले काम रखडण्यामागे नक्की काय कारण आहे हे पुढे येत नाही. जर बांधकाम विभाग आणि कंत्राटदाराने सदर काम त्वरित सुरु न केल्यास त्यांना शेकापपक्षाच्या स्टाईलने धडा शिकवला जाईल.
– अनिल पाटील
शेकापक्ष तालुका चिटणीस

या कामात कोणी लोकप्रतिनिधी टक्केवारी मागून त्रास देत आहे का? किंवा इतर मार्गाने आपल्याकडूनच साहित्य विकत घेण्यासाठी वा डंपर लावण्यासाठी दबाव आणत आहेत का? याचीही विचारणा केली. कोणी असे प्रयत्न करीत असेल, तर तसे स्पष्ट सांगा. त्याला चांगला धडा शिकवून शेकाप संरक्षण देईल, अशी हमी यावेळी देण्यात आली.
– मधू ढेबे, माजी सरपंच

# अजंठा लाँचमधून प्रवासी पाण्यात
## दैवबलवत्तर म्हणून वाचला जीव

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग, मुंबईला जाण्या-येण्यासाठी लाँचचा प्रवास सोयीस्कर मानला जातो. यामुळे वेळेची आणि पैशाचीही बचत होते. त्यामुळे कित्येकजण याच मार्गाचा अवलंब करतात. मंगळवारी सकाळी याच मार्गावरुन जाणाऱ्या अजंठा लाँचमधून प्रवासी समुद्रात पडून अपघात झाला. दैवबलवत्तर म्हणून प्रवासी वाचला असला तरी असे अपघात अजंठा लाँचमध्ये वारंवार होत असल्याने प्रवाशांमधून भीती व्यक्त होत आहे.



याबाबतची हकीकत अशी की, प्रशांत कांबळे हा प्रवासी सकाळी नऊ वाजताच्या अजंठा बोटीने गेटवे येथून मांडवाकडे निघाला होता. यावेळी बोटीच्या एका बाजूला प्रशांत उभा होता. त्यावेळी बोटीच्या कर्मचाऱ्यांनी त्याठिकाणी उभे राहू नका असे सांगितले होते. मात्र, प्रशांतने त्याकडे दुर्लक्ष केले त्यामुळे तो समुद्रात पडला. बोटीतून त्याला दोरी टाकून खेचण्यात आले, त्यामुळे तो बचावला. प्रशांतने मी स्वतःच्या चुकीने पडलो असल्याचे मांडवा पोलिसांना सांगितले. त्यामुळे कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. मात्र, अजंठा बोटीमधून प्रवास करताना अनेकवेळा प्रवासी हे जीव मुठीत घेऊन प्रवास करतात, हे मात्र नक्की. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अजंठा प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबत महाराष्ट्र मेरिटाईमने अजंठा बोटीची तपासणी करण्याची मागणी होत आहे.




## म ह त्वा चे

### मोटारसायकलस्वाराचा अपघातात मृत्यू

**पोलादपूर :** तालुक्यातील पोलादपूर-महाबळेश्वर मार्गावरील कापडे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील रानबाजिरे गावाच्या तीव्र वळण उतारावर ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वाराचा मृत्यू झाला. निलेश कृष्णा सुतार (३०, साखर-सुतारवाडी, ता. पोलादपूर) रानबाजिरे गावाच्या हद्दीत सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास भरधाव वेगाने मोटारसायकल चालवित आला. यावेळी ट्रक क्रमांक एमएच ०४ केएफ ०६०७ पोलादपूरच्या दिशेने जात असताना निलेशने मोटारसायकलचा वेग कमी न करताच ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. यावेळी रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या दगडाला मोटारसायकलची ठोकर लागून अपघात झाला. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नितेश राणेंचा आज फैसला

**मुंबई :** सिंधुदुर्ग जिल्हा बँक निवडणुकीदरम्यान शिवसेनेच्या संतोष परब यांच्यावर झालेल्या



हल्ल्याप्रकरणी नितेश राणे यांना सध्या न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून, त्यांच्या नियमित जामिनासाठी सिंधुदुर्ग न्यायालयात सुनावणी पार पडली. याबाबत न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेत उद्या ११ वाजता निर्णय सुनावणार असल्याचे जाहीर केले. सरकार पक्षातर्फे ॲड. प्रदीप घरत यांनी, तर आ. नितेश राणे यांच्या बाजूने ॲड. सतीश माने शिंदे यांनी युक्तीवाद केला.

### आजपासून बारावीच्या विद्यार्थ्यांना हॉलतिकीट

**पुणे :** बारावीच्या परीक्षा वेळापत्रकानुसारच होणार असल्याचे शिक्षण मंडळाने जाहीर केले आहे. तसेच परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येतील, असे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे. त्यापार्श्वभूमीवर बारावीच्या विद्यार्थ्यांना उद्यापासून ऑनलाईन पद्धतीने हॉलतिकीट मिळणार आहे. दुपारी एकनंतर विद्यार्थ्यांना हॉलतिकीट डाऊनलोड करता येणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाने दिली आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी मुलांचे लसीकरण करीत शाळा सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाकडून याआधीच घेण्यात आला आहे.

## जिल्ह्यातील दरडग्रस्त गावांच्या कायम पुनर्वसनाकरिता
# १३ कोटी २५ लाखांचा निधी मंजूर

### मदत व पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळल्याने बाधित झालेल्या रायगड जिल्ह्यातील गावांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाकरिता १३ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, असं आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.



संग्रहित छायाचित्र

दि. २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील तळीये, कोंडाळकरवाडी व बौद्धवाडी, केवनाळे व पोलादपूर तालुक्यातील साखर (सुतारवाडी) ही गावे बाधित झाली होती, तसेच मनुष्यहानीदेखील झाली होती. दरड कोसळून बाधित झालेल्या नागरिकांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याच अनुषंगाने या गावांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाकरिता भूसंपादन तसेच नागरी व सार्वजनिक सोयी-सुविधा, विद्युतपुरवठा तसेच जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करणे या कामांकरिता १३ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

त्याअंतर्गत महाड तालुक्यातील तळीये, कोंडाळकरवाडी व बौद्धवाडीमध्ये भूसंपादन करण्यासाठी २ कोटी ९२ लाख १७ हजार ७६१ रुपये, केवनाळेमध्ये भूसंपादन करण्यासाठी ६४ लाख २६ हजार १४८ रुपये, पोलादपूर तालुक्यातील साखर (सुतारवाडी) साठी ३८ लाख ४१ हजार ७८६ रुपये असे एकूण भूसंपादनासाठी ३ कोटी ९४ लाख ८५ हजार ६९५ रुपये, तर महाड तालुक्यातील तळीये तर पान ५ वर

# तिवरांची कत्तल करणारे अटकेत

**। मुरूड । वार्ताहर ।**

विहूर जमीन घोटाळा संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधणार ठरला आहे. याच जागेमधील तिवरांची कत्तल राजरोसपणे सुरू असल्याची तक्रार करूनही प्रशासन मूग गिळून गप्प असल्याने ग्रामस्थांनीच संघर्षाची तयारी केली. रात्रीची गस्त घालून तिवरांची कत्तल करून ते गाडण्याचे काम करणाऱ्याना विहुर ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. अन्य कामगार दोन टेम्पोतून पसार झाले आहेत.




याबाबत विहूर ग्रामस्थांनी तिवरांची कत्तल पान ५ वर






## पनवेल महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग
## 'नागरिकांना जाहीर आवाहन'

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२२/प्र.क्र.३८/५७/२०२२
दिनांक : ०८-०२-२०२२

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील नागरिकांना सूचित करण्यात येते की, शहरास होणारा पाणी पुरवठा हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व देहरंग धरण मिळून एकत्रितपणे करण्यात येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या संस्थेस पाताळगंगा नदीतून दर रविवार व सोमवार या दिवशी कमी पाणी मिळते व इतर काळात इलेक्ट्रीक शटडाऊन, ब्रेकडाऊनमुळे दोन्ही संस्थेकडून वारंवार कमी पाणी मिळत असल्याने देहरंग धरणाचे जास्त पाणी घेवून शहराची दररोजची गरज भागविण्यात येते. परंतु त्यामुळे धरणातील पाणीसाठी कमी झाला, ही वस्तूस्थिती विचारात घेता धरणातील शिल्लक असलेला पाणीसाठा माहे १५ जून २०२२ पर्यंत पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या दृष्टीने गुरुवार दि. १०-०२-२०२२ रोजीपासून पनवेल शहरामध्ये उंच जलकुंभ निहाय एक भाग आठवड्यातून एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वार | उंच जलकुंभाचे ठिकाण | पाणीपुरवठा बंद राहणाऱ्या भागाचे नाव | पाणीपुरवठा सुरु राहणाऱ्या भागाचे नाव व वेळ | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वेळ | पाणी सुरु राहणारा भाग |
| १ | सोमवार | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | सुभेदार वाडा, गुणे हॉस्पिटल, शिवसेना कार्यालय ते भैरवनाथ डेअरीपर्यंत, भैरवनाथ डेरी ते ससाने हॉस्पिटलपर्यंत, अशोका गार्डन सोसा. मेवाड हॉटेल ते मशीद पर्यत, अर्बन को.ऑप.बँक ते साई पार्क, अर्बन को.ऑप. बँक ते गणपती परिसर, गुडेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत घाटे आळी, गावदेवी मंदिर परिसर गुडेकर डेअरी ते पनवेल पॅलेस पर्यंत, परदेशी आळी ते अंबर सोसा.पर्यंत,गावदेवी पाडा भाग, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल, दांडेकर हॉस्पिटल ते अचुत मनोरे यांच्या घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, परदेशी आळी सर्व बैठी घरे, मेन व्हॉल, रचना रेसीडेन्सी सोसा. अष्टविनायक कॉलनी सर्व परिसर, गुणे हॉस्पिटल ते श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत. श्री लॉज ते निलेटा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा सर्व बैठी घरे, आदर्श हॉटेल ते श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत, यशोपरुम सोसा. आगरी समाज ते व्ही.के, हायस्कूल पर्यंत जुने पोस्ट ते डॉ. बुधकर दवाखान्यापर्यंत श्री. गांगल यांच्याघरापर्यंत ते महाड बँक जय भारत नाका ते मेवाड हॉटेलपर्यंत, जय भारत नाका ते भिंडे यांच्याघरापर्यंत घोडसे आळी बैठी घरे, विरुपाक्ष मंदिर ते लोंढे मॅडम यांच्याघरापर्यंत,आदर्श हॉटेल ते आदित्य कॉम्पलेक्स पर्यंत मनिष मार्केट, जय भारत नाका ते बैठी घरे, जैन मंदिरपर्यंत, जय भारत नाका ते रतन टॉकीज पर्यंत, त्रिमूर्ती सहनिवास सोसा. अन्नपूर्णा हॉटेल ते निसर्ग बिल्डींगपर्यंत, गोखले हॉल ते प्रज्ञा सोसायटीपर्यंत मालधक्का परिसर, नवनाथ झोपडपट्टी, शिवाजी नगर झोपडपट्टी, सर्व्हिस हौद ते सम्राट हॉटेल पर्यंत, अंबिका नगर, लोकमान्य नगर | सकाळी ५-३० ते सकाळी ७.०० | माणिक नगर, स्नेहसदन सोसा. येशोदिप सोसा. |
| | | | | सकाळी ५.३० ते सकाळी ६.४५ पर्यंत | पटेल पार्क भाग, उपजिल्हा रुग्णालय, |
| | | | | सकाळी ६.४५ ते सकाळी ८.०० पर्यंत | जैन मंदिरपासून भुसार मोहल्ला बैठी घर |
| | | | | सकाळी ८.०० ते सकाळी ९.३० पर्यंत | पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनूर टेक्निकल ते किंग इलेक्ट्रोनिक पर्यंत, कोहिनूर टेक्निकल ते नवनाथ मंदिरापर्यंत लक्ष्मीवसाहत |
| | | | | सकाळी ९.३० ते सकाळी १०.४५ पर्यंत | मामलेदार कचेरी ते दत्तराज सोसायटी |
| | | | | सकाळी १०.४५ते दुपारी १२.०० पर्यंत | साठेगल्ली, विरुपाक्ष मंदिर ते साहिल सोसायटी पर्यंत, सिटी स्टोअर्सगल्ली, सिनियर ज्युनिअर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटलपर्यंत. |
| | | | | दुपारी १२.०० पर्यंत दुपारी १.१५ | गायकर गल्ली सर्व बैठी घर शुभलाभ सोसा ते सहयोग नगरपर्यंत, |
| | | | | दुपारी १.१५ ते दुपारी २.३० पर्यंत | सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटीपर्यंत, उमा शंकरसोसा. ते यशोवर्धन पर्यंत. |
| | | | | दुपारी २.३० ते दुपारी ३.४५ पर्यंत | आदर्श हॉटेल ते रत्नेश अपार्टमेंट पर्यंत |
| | | | | दुपारी ३.४५ ते सायं. ५.०० | कुबेर सोसायटी ते शुभलाभ सोसायटी, धुतपापेश्वर ते मुनोथ नगरपर्यंत. |
| | | | | सायं. ५.०० ते सायं. ६.१६ | मुनोथ नगर ई विंग |
| | | | | सायं. ६.१५ ते सायं. ९.१५ | प्रिन्स पॅराडईज सोसा सनराईज सोसा. केशव सोसायटी. |
| २ | मंगळवार | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | माणिकनगर, स्नेहसदन सोसायटी, येशोदिप सोसायटी पटेल पार्क भाग उपजिल्हा रुग्णालय, जैन मंदिरपासून भुसार मोहल्ला बैठी घर, पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनूर टेक्निकल ते किंग इलेक्ट्रोनिकपर्यंत, कोहिनूर टेक्निकल ते नवनाथ मंदिरापर्यंत, मामलेदार कचेरी ते दत्तराज सोसायटी, साठेगल्ली, विरुपाक्ष मंदिर ते साहिल सोसायटीपर्यंत, सिटी स्टोर्स गल्ली, सिनियर ज्युनियर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटलपर्यंत गायकर गल्ली सर्व बैठी घर, शुभलाभ सोसा ते सहयोग नगरपर्यंत, सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटीपर्यंत उमा शंकर सोसा. ते यशोवर्धन पर्यंत. आदर्श हॉटेल ते रत्नेश अपार्टमेंटपर्यंत, कुबेर सोसायटी शुभलाभ सोसायटी धुतपापेश्वर ते मुनोथ नगरपर्यंत. मुनोथ नगर ई विंग प्रिन्स पॅराडईज सोसा. सनराईज सोसा. केशव सोसायटी | पहाटे ५.३० ते सकाळी ६.४५ | शिवसेना कार्यालय ते भैरवनाथ डेअरीपर्यंत, अशोका गार्डन सोसा. |
| | | | | सकाळी ६.३० ते सकाळी ७.३० | मेवाड हॉटेल ते मशीद पर्यंत |
| | | | | सकाळी ७-३० ते सकाळी ८.३० | अर्बन बँक ते साई पार्क |
| | | | | सकाळी ८.०० ते सकाळी ९.१५ | अर्बन बँक ते गणपती परिसर |
| | | | | सकाळी ९.१५ ते सकाळी ११.०० | श्री. गांगल यांच्याघरापर्यंत ते महाड बँक जय भारत नाका ते भिंडे यांच्या घरापर्यंत. |
| | | | | सकाळी ६.४५ ते सकाळी ८.१५ | गुडेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत घाटे आळी, गावदेवी परिसर |
| | | | | सकाळी ८.१५ ते सकाळी ९.३० | गुडेकर डेअरी ते पनवेल पॅलेस पर्यंत, परदेशी आळी ते अंबर सोसा. पर्यंत, गावदेवी पाडाभाग |
| | | | | सकाळी ९.३० ते सकाळी ११.०० | गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल |
| | | | | सकाळी ११.१५ ते दुपारी १२.३० | दांडेकर हॉस्पिटल ते अच्यूत मनोरे यांच्या घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटलपर्यंत परदेशी आळी सर्व बैठी घरे. घोडके आळी बैठी घरे, विरुपाक्ष मंदिर ते लोंढे मॅडम यांच्याघरा पर्यंत |
| | | | | दुपारी १२.३० ते दुपारी १.४५ | जय भारत नाका ते बैठी घरे पर्यंत जैन मंदिर पर्यंत |
| | | | | सकाळी ११.१५ ते दुपारी १.४५ | आदर्श हॉटेल ते अदित्य कॉम्पलेक्सपर्यंत मनिष मार्केट |
| | | | | दुपारी १.४५ ते दुपारी ३.०० | जय भारत नाका ते रतन टॉकिजपर्यंत |
| | | | | दुपारी ३.०० ते दुपारी ४.१५ | त्रिमुर्ती सहनिवास सोसा. |
| | | | | दुपारी १२.३० ते दुपारी ३.०० | मेन व्हॉल |
| | | | | दुपारी ३.०० ते सायं. ५.०० | अन्नपूर्णा हॉटेल ते निसर्ग बिल्डींग पर्यंत |
| | | | | सायं. ४.१५ ते सायं. ५.३० | गोखले हॉल ते प्रज्ञा सोसायटी पर्यंत |
| | | | | दुपारी १२.३० ते दुपारी १.४५ | रचना रेसिडेन्सी सोसा. अष्ठविनायक कॉलनी सर्व परिसर, गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत |
| | | | | दुपारी १.४५ ते दुपारी ३.०० | श्री लॉज जे निलेटा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा सर्व बैठी घरे, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पर्यंत |
| | | | | दुपारी ३.०० ते दुपारी ४.१५ | यशोपुरम सोसा. आगरी समाज हॉल ते व्ही.के.हायस्कूलपर्यंत |
| | | | | दुपारी ४.१५ ते सायं. ५.३० | जुने पोस्ट ते डॉ. बुधकर दवाखान्यापर्यंत |
| | | | | सायं. ४.०० ते सायं. ६.०० | अंबिका नगर |
| ३ | सोमवार | मार्केट यार्ड उंच जलकुंभ | मार्केट यार्ड उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहील. | .... | मार्केट यार्ड उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहील. |
| ४ | सोमवार | भाजीमार्केट उंच जलकुंभ | भाजी मार्केट उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा बंद राहिल | | भाजी मार्केट उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा बंद राहील. |
| ५ | मंगळवार | पटेल मोहल्ला उंच जलकुंभ | पटेल मोहल्ला उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहिल | | पटेल मोहल्ला उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहील. |
| ६ | बुधवार | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरु राहिल. | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरु राहील. |
| ७ | गुरुवार | ठाणा नाका उंच जलकुंभ | ठाणा नाका उंच जलकुंभातून व पायोनिअर सोसायटी परिसर होणारा पाणीपुरवठा बंद राहिल. | | ठाणा नाका उंच जलकुंभातून व पायोनिअर सोसायटी परिसर होणारा पाणीपुरवठा बंद राहिल. |
| ८ | गुरुवार | सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ | सुनिल बहिरा ऑफीस ते उर्दु शाळा परिसर पर्यंत, पगडे आळी परिसर पर्यंत, तक्का गाव एकविरा मंदिर परिसर पर्यंत, तक्का गाव शाळा, परिसर व भगत आळी, सावंतामाळी हॉल परिसर, आझादनगर झोपडपट्टी एन.के. हेरीटेज सोसा. साईबाबा मंदिर परिसर, निलसिद्धी गार्डन, न्यु इडन गार्डन सोसा. रिद्धी हाऊस व सिद्धी हाऊस सोसा. पर्यंत कातकरी वाडी ते प्रजापती कॉम्पलेक्स पर्यंत वैद्यवाडी, गोदरेज सोसा. मिडलक्लास सोसा. (भाग-१) आमदार निवास रोड परिसर, प्लॉट नं.११ ते प्लॉट नं. १ पै मॅडम निवास पर्यंत, विश्राळी तलाव ते पंजाब हॉटेल, पेट्रोल पंप विश्राळी नाका ते पंजाब हॉटेल पर्यंत, विश्राळी तलाव झोपडपट्टी परिसर. मिडल क्लास सोसायटी भाग २- गांधी हॉस्पिटल, आय.सी.सी.आय बँक पर्यंत, गांधी हॉस्पिटल ते ॲक्सिस बँक पर्यंत, प्लॉट नं. ६४ ते रायगड बँक पर्यंत, शेषगिरी बंगला ते अमेय हॉस्पिटलपर्यंत, प्लॉट नं. ३६ ते रुपाली टॉकिजपर्यंत. | सांय. ७.०० | मेन व्हॉल खुटकर व्हॉल, पन्नास नंबर व्हॉल |
| | | | | सायं. ८.०० ते रात्री ९.३० | मेन व्हॉल, कस्तुरी ABCD सोसा. नं. १, कस्तुरी सोसा. नं.२,(AA BB,) कस्तुरी सोसा नं. २(EFG) कस्तुरी नं. १सोसा. (कस्तुरी नवीन लाईन३ ABCD), नॅशनल गॅलेक्सी सोसा., नॅशनल रेसिडन्सी सोसा., हॉयलॅन्ड पार्क सोसा. मोराज छोटा गेट परिसर |
| | | | | रात्री ११.०० ते पहाटे १२.३० | नॅशनल पॅरराडाईज सोसा. गंगाजमुना सोसा. सन गंगौत्री सोसा.MA टाईप सोसा,KL मोराज सोसा. नॅशलन गार्डन सोसा. कॉस्मो पॉलिटेक्नीकल सोसा. |
| | | | | पहाटे १२.३० ते पहाटे २.०० | नॅशनल पॅलेस D सोसा, नॅशनल पॅलेस ABC सोसा कॉस्मो पॉलिटेक्निकल सोसा. CD wing तक्का MECB, कांडपिले रेसीडेन्सी सोसा. गोविंद हारमोनियम सोसा. पर्लहोम सोसा. |
| | | | | पहाटे २.०० ते पहाटे ३.०० | टाकी भरणे |
| | | | | पहाटे ३.०० ते पहाटे ५.०० | मोराज मोठा गेट परिसर (मोराज MA १,२,३,४, T, T2, T३, T४, S, S२, S३, S४, S५, S६, मोराज तापी नर्मदा, मोराज R, R2, R३, R4, K३, K४, MA, KL |
| ९ | शुक्रवार | सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ | मेन व्हॉल खुटकर व्हॉल, पन्नास नंबर व्हॉल मेन व्हॉल, कस्तुरी ABCDसोसा नं.१, कस्तुरी सोसा नं.२, (AA BB,) कस्तुरी सोसा, नं.२ (EFG),कस्तुरी नं. १ सोसा. (कस्तुरी नवीन लाईन ३ ABCD), नॅशनल गॅलेक्सी सोसा., नॅशलन रेसिडन्सा सोसा., हॉयलॅन्ड पार्क सोसा, मोराज छोटा गट परिसर, नॅशनल पॅरराडाईज सोसा., गंगाजमुना सोसा. सन गंगौत्री सोसा.MA, टाईप सोसा, KL, मोराज सोसा., नॅशनल गार्डन सोसा. कॉस्मो पॉलिटेक्नीकल सोसा. CD wing तक्का, MSEB,कांडपिले रेसिडेन्सी सोसा. गोविंद हारमोनियम सोसा, पर्लहोम सोसा मोराज मोठा गेट परिसर, (मोराज MA १,२,३,४, T, T2, T३, T४,S, S२, S३,S४, S५,S६, मोराज तापी नर्मदा, मोराज R, R२, R३, R४, K३, K४, MA,KL, | सकाळी ६.०० ते सकाळी ७.१५ | पगडे आळी परिसर पर्यंत, तक्का गाव पुर्ण एकविरा मंदिर परिसर पर्यंत, भगत आळी पर्यंत सावता माळी हॉल परिसर |
| | | | | सकाळी ९.३० ते सकाळी ११.०० | मेन हॉल, आझाद नगर सोसा. परिसर, एन.के.हेरिटेज सोसा. साईबाबा मंदिर परिसर, रिध्दी सिध्दी गार्डन सोसा, न्यु इडन सोसा. रिध्दी हाऊन व सिध्दी हाऊस सोसा. कातकरी वाडी ते प्रज्ञापती कॉम्पलेक्स पर्यंत वैद्यवाडी गोदरेज सोसा. |
| | | | | दुपारी १.०० ते दुपारी २.१५ | मिडलक्लास सोसा. भाग-१ आमदार सोसा.निवास रोड परिसर, प्लॉट नं.११ ते प्लॉट प्लॉट नं.१ पै मॅडम निवास पर्यंत, विश्राळी तलाव ते पंजाब हॉटेल, पेट्रोल पंप पर्यंत विश्राळी नाका ते पंजाब हॉटेल पर्यंत, विश्राळी तलाव झोपडपट्टी परिसर |
| | | | | दुपारी ४ ते सायं ५.१५ पर्यंत | मिडल क्लास सोसायटी भाग-२ गांधी हॉस्पिटल ते आय.सी.सी. आय बँक पर्यंत, गांधी हॉस्पिटल ते ऑक्सिस बँक पर्यत, प्लॉट नं.६४, ते रायगड बँक पर्यंत, शेषगीरी बंगला त अमेय हॉस्पिटल पर्यंत, प्लॉट नं.३६ ते रूपाली टॉकिज पर्यंत. |
| १० | शनिवार | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरू | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरू |
| ११ | रविवार | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरू | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरू |

टिप - उपरोक्त वेळापत्रका मध्ये उपलब्ध पाणीपुरवठ्या नुसार वेळोवेळी बदल करण्यात येईल.

**सही/-**
**कनिष्ठ अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

**सही/-**
**उप अभियंता (पापु)**
**पनवेल महानगरपालिका**

# पनवेलमध्ये स्वच्छता मोहिमेचे आयोजन

## जे.एम. म्हात्रे ट्रस्टसह विविध संस्थांचा सहभाग

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पालिका प्रशासनावर स्वच्छतेच्या बाबतीत अवलंबून न राहता पनवेल महानगरपालिकेचे स्वच्छतादूत त्यांच्यासोबत स्वयंस्फूर्तीने माझ्या जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या सभासदांसोबत इश फाऊंडेशन, झिरो फाऊंडेशन, युवा फाऊंडेशन, सुमन साळी महिला व बाल विकास संस्था, अक्षरवेल ज्योती फाऊंडेशन, लायन्स क्लब ऑफ कामोठे, पंजाबी कल्चर अँड वेल्फेअर असोसिएशन, लक्ष्यपूर्ती वेलफेअर फेडरेशन या सर्व सामाजिक संस्था आणि त्यांचे सदस्य तसेच खारघर मधील नागरिकांनी स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले होते.

पनवेल महानगरपालिका स्थापन झाल्यापासून नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत पालिका प्रशासनावर अवलंबून न राहता सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन हा सुरू केलेला उपक्रम खूपच कौतुकास्पद आहे.

विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे या स्वच्छता मोहिमेच्या कार्यक्रमात सहभागी झाले. त्यांच्यासोबत त्यांच्या संस्थेच्या सभासदांनीसुद्धा श्रमदान केले.

**या स्वच्छता मोहिमेसारखी विविध सामाजिक उपक्रम इतर सामाजिक संस्थांनी सुद्धा पुढाकार घेऊन राबवावे. जेणेकरून आपले पनवेल महानगरपालिका क्षेत्र स्वच्छ आणि आरोग्यमय होईल.**
**– प्रीतम म्हात्रे,** विरोधी पक्षनेते



### अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**९ फेब्रुवारी**

१) श्री. राजेश पंड्या
०९-०२-१९५६
अलिबाग
२) श्रीम. लता बंद्री
०९-०२-१९५१
बंदरपाडा, पोपटगल्ली
३) श्रीम. पद्मिनी पावशे
चेंढरे-अलिबाग
०९-०२-१९५८

# परळीत अवैध पार्किंग करणाऱ्यांवर कारवाई

## वाहतूक पोलिसांची ३० हजारांची दंडवसुली

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

पालीखोपोलीराज्यमहामार्गावर सुधागड तालुक्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळख असलेल्या परळी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. या पार्श्वभूमीवर अस्ताव्यस्त लावलेल्या वाहनांवर पाली वाहतूक पोलिसांनी धडक कारवाई करीत ३० हजारांचा दंड वसूल केला.

ग्रामस्थांनीदेखील परळी बाजारपेठेतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी केली होती. परळी ग्रामपंचायत व पाली पोलीस यांनी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. या पार्श्वभूमीवर पाली पोलिसांच्या वाहतूक शाखेने तसेच पाली पोलीस ठाणे अंतर्गत जांभुळपाडा पोलीस दूर क्षेत्राचे पोलीस यांनी संयुक्तरीत्या परळी बाजारपेठेत धडक मोहीम राबविली. या मोहिमेत साधारणपणे ५८ केसेस करण्यात आल्या, तर २९,५०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली.

यावेळी एएसआय मोहन म्हात्रे, एस.एस. खेडेकर, निलेश महाडिक, कांचन भोईर, बी.एच. वाव्हळ आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते. पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे परळीकर समाधान व्यक्त करीत असून, पोलिसांनी अशाच प्रकारची कारवाई अधूनमधून करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## मुरुड ग्रामीण रुग्णालयाची

# मद्यप्याकडून तोडफोड

**मध्यरात्रीची घटना, अधिकारी, कर्मचारी भयभीत**



। आगरदांडा । वार्ताहर ।

मुरुड ग्रामीण रुग्णालयाची एका मद्यपी रुग्णाने तोडफोड करण्याचा प्रकार घडला असून, यामुळे रुग्णालयातील डॉक्टर्स, नर्सेस आणि अन्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सोमवारी ( ७ फेब्रुवारी) रोजी सकाळी १० वा मद्यपी रुग्ण मंगेश शंकर जगताप (वय ३८) हा उपचारासाठी दाखल झाला होता. सदरील रुग्ण मानसिकरित्या पूर्णतः शुद्धीत नसल्याने त्याला डॉक्टरांनी अलिबाग येथे जाण्यास संदर्भ चिठ्ठी देऊन जाण्यास सांगितले. परंतु तो जाण्यास अजिबात तयार नव्हता. रुग्णालयामध्ये एकही सुरक्षा रक्षक नसल्यामुळे त्याला कोणी बाहेर काढू शकले नाही. याच रुग्णाने रात्री रुग्णालयाच्या आवारात गोंधळ घातला. धुंदीतच त्याने मध्यरात्री २.३० च्या सुमारास लोखंडी रॉड च्या साहाय्याने सामान्य वॉर्ड, प्रयोग शाळा, तातडीचा विभाग व प्रसूती रूम मधील सर्व दरवाजे आणि खिडक्यांच्या काचा फोडल्या, प्रयोग शाळेतील कपाट, फ्रीज, तसेच इतर साहित्य तोडफोड केली, बाहेर ठेवलेले पाण्याचे कूलर तोडले, प्रसूती रूम मधील सर्व साहित्यांची तोडफोड केली आणि लोखंडी रॉड घेऊन रुग्णालयात ड्युटी वर असलेल्या महिला कर्मचाऱ्यांच्या अंगावर धाव घेतली. ही तोडफोड सुमारे १ तास करत होता. यावेळी रुग्णालयात काम करणाऱ्या बहुतांश महिला कर्मचारी असल्याने त्याला कोणीच अडवू शकले नाही.

> मुरुड ग्रामीण रुग्णालयात लवकरच सुरक्षा पद भरले जाईल आणि झालेल्या घटनेचा अहवाल घेण्यात येईल. तसेच पोलीस अधीक्षक यांना पत्र देऊन संबंधित व्यक्ती वर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जाणार आहे.
>
> – डॉ. सुहास माने, जिल्हा शल्य चिकित्सक

रुग्णालयात बहुतांश कर्मचारी या महिला आहेत. रात्री बेरात्री महिला रुग्णालयात काम करताना संपूर्ण असुरक्षित काम करतात. प्रशासनाला सुरक्षा रक्षकांची वेळोवेळी मागणी करून सुद्धा प्रशासन याकडे पुर्णतः दुर्लक्ष करत असल्याने कर्मचारी वृंदानी नाराजी व्यक्त केली आहे. याबाबत मुरुड ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. विजय हाडबे यांनी मुरुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून संबंधित आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## अलिबाग तालुक्यातील

# शेकापमुळेच विकासकामे

। अलिबाग । वार्ताहर ।

शेकापच्या माध्यमातूनच अलिबाग तालुक्यातील विकासकामे केली जात असल्याचा दावा, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केला आहे.

भिलजी येथील विविध विकासकामांचा प्रारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. रस्त्याचे भूमीपूजन, शेड आणि नळ पाणी योजनेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमांना शेकापचे पदाधिकारी अरुण भगत,



**॥ चित्रलेखा पाटील यांचा दावा**

**॥ भिलजी परिसरात विविध कामांचे उद्घाटन**

मधू ढेंबे, महेश झावरे, विक्रांत वार्डे, विश्वनाथ झावरे आदी उपस्थित होते.

> आ. जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग तालुक्याचा नियोजनबद्ध विकास सुरु असून, जनहिताचा विचार करुनच आम्ही विकासकामांना प्राधान्य देत आहोत. यापुढेही हे धोरण राबवून विकासकामे केली जातील.
>
> – चित्रलेखा पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख

सुविधा उपलब्ध झाल्याने ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

---

## म ह त्त्वा चे

### चाकूच्या धाकाने चालकाला लुटले

**पनवेल :** चाकूचा धाक दाखवून एका टेम्पो चालकाला पावणे सहा लाखांना लुटल्याची घटना पनवेल जवळील कर्नाळा घाटाच्या उतारावर घडली आहे. जैसराज यादव (वय-२४) हा त्याच्या ताब्यातील टेम्पो घेऊन कामोठे ते माणगाव असा प्रवास करीत असताना कर्नाळा घाटाच्या उतारावर पळस्पे-पेण मार्गावर त्याच्या मागून येणाऱ्या दोन अनोळखी मोटारसायकलस्वारांच्या इसमांनी टेम्पोला अडवून त्याला चाकूचा धाक दाखवून त्याच्या टेम्पो केबिनमध्ये ड्रायव्हर सीट खाली ठेवलेली ५ लाख ७५ हजारांची रोखरक्कम, मोबाईल व टेंपोची चावी असा एकूण ५, ७६, ६०० रुपयांचा माल जबरीने चोरून ते पळून गेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गटारात सापडला मृतदेह

**पनवेल :** पनवेल जवळील रेल्वे लाईट हाऊसच्या गटारात एका इसमाचा मृतहेद आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत. कोकण रेल्वे मार्ग पनवेल रेल्वे स्थानकाचे फलाट क्र.-१ पासून पश्चिमेस सुमारे ५० ते ६० मी. अंतरावर रेल्वे लाईट हाऊसच्या गटारात एका इसमाचा मृतहेद आढळून आला असून त्याचे अंदाजे वय २० ते २५ वर्षे आहे. उंची ५ फूट, रंग सावळा, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस बारीक, दाढी कमी वाढलेली व तो नग्न अवस्थेत गटारात तरंगताना आढळून आला आहे. याबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दुरध्वनी-२७४५२३३३ किंवा सहा. पोलीस निरीक्षक अनिल देवळे यांच्याशी संपर्क साधावा.

### तरूणाचा मृत्यू

**पनवेल :** गणपती विसर्जनासाठी गेलेल्या तरूणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना पनवेल शहरातील कोळीवाडा परिसरात घडली आहे. राम अनंता शेलार (वय-२२) हा रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास गणपती विसर्जनासाठी खाडीत गेला असता त्याचा तेथे बुडून मृत्यू झाला आहे. सकाळी त्याचा मृतदेह खाडीत सापडला.

### माणगावात कोरोना घसरतोय

**माणगाव :** माणगाव तालुक्यात १ नवा कोरोनाग्रस्त रुग्ण आढळला असून ३ रुग्ण बरे झाले असून सध्या तालुक्यात २८ रुग्ण बाधित आहेत. सध्या त्यांच्यावरच घरातच उपचार सुरु आहेत.कोरोनाचा अटकाव करण्यासाठी सरकारी नियमांचे पालन करण्याचे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आलेले आहे.

---

## राष्ट्रवादीत गेलेल्या शिवसैनिकांना पश्चाताप होणार

**अनिल नवगणे यांचा दावा**

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

शिवसेना सोडून राष्ट्रवादीत गेलेल्या कार्यकर्त्यांना पक्षप्रवेशाचा पश्चाताप होईल,असा दावा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अनिल नवगणे यांनी केला आहे. तोंडलेकर यांच्या घोषणेला उत्तर देण्यासाठी शाम भोकरे यांनी बोर्लीपंचतन येथील आगरी समाज सभागृह येथे आढावा बैठकीचे आयोजन केले होते.यावेळी नवगणे यांनी राष्ट्रवादीच्या कार्यपद्धतीवर टीका केली.

जिल्हाप्रमुखांनी सुकुमार तोंडलेकर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशावर जोरदार टिका करताना सांगितले की,जिल्हा परिषदेची उमेदवारी मिळावी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसमधे प्रवेश करणारे स्वार्थी तोंडलेकर यांना व त्यांच्या बरोबर प्रवेश करणाऱ्या सहकार्यांना सहा महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस काय पक्ष आहे ते समजेल. लगावतांना सुकुमार तोंडलेकर हे स्वार्थी व लबाड आहेत, अशी टीका केली.

बैठकीस माजी आमदार तुकाराम सुर्वे, अरुण शिगवण,सभापती बाबुराव चोरगे, मीना गाणेकर, राजेश चव्हाण,प्रितम श्रीवर्धनकर,जितेंद्र माळी,कुमार गाणेकर,जगन्नाथ चाळके तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तरुण बेपत्ता

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ पोलीस ठाणे हद्दीमधील कोलीवली गावातील फर्नांडे चाळीमध्ये राहणारे ३० वर्षीय सुभाष व्यंकट चौगुले हे ११ डिसेंबर २०२१ पासून हरवले आहेत. त्याबद्दल नेरळ पोलीस ठाण्यात मिसिंग ची तक्रार दाखल झाली आहे.कोलीवली येथील चाळीत राहणारे सुभाष चौगुले यांच्या घरातून बेपत्ता होण्याची तक्रार त्यांच्या पत्नी रेखा सुभाष चौगुले यांनी दिली आहे.सुभाष चौगुले हरवले तेंव्हा त्यांच्या अंगावर पिवळ्या रंगाचा शर्ट आणि काळ्या रंगाची पॅन्ट आणि पायात परेकॉन च्या चपला होत्या. त्यांची उंची १६७ सेमी इतकी असून मध्यम बांध्याचे आणि त्यांच्या डाव्या हातावर दुर्गाबाई तर छातीवर सुनीता असे कोरलले आहे.

## शेकाप नगरसेवकांचा विकासकामांचा धडाका



। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महापालिकेतील शेकाप नगरसेवकांच्या प्रभागात विविध विकास कामांचा धडाका विरोधी पक्ष नेता प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आला.

नगरसेविका डॉ. सुरेखा मोहकर यांच्या फंडातून चार ठिकाणी हायमास्ट उद्घाटन करण्यात आले. तसेच लिंगायत समाजाच्या स्मशानभूमी बाजूला कुंपण करण्यात आले. तसेच खांदा वसाहतीच्या नगरसेविका कुसुम पाटील यांच्या फंडातून सेक्टर ६ च्या गार्डन येथे ओपन जिमच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

नगरसेविका सारिका भगत यांच्या नगरसेवक फंडातून सेक्टर १३ येथील सिडको गार्डन भूखंड ओपन जिम कामाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला नगरसेवक गणेश कडू, नगरसेविका डॉ सुरेखा मोहकर, प्रीति जॉर्ज, कुसुम पाटील, सारिका भगत, माजी नगरसेवक गणेश पाटील यांच्यासह मान्यवर ज्येष्ठ नागरिक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्वच कार्यक्रमांमध्ये प्रीतम म्हात्रे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन त्याची विचारपूस केली.

## श्रीवर्धन प्रेस क्लबची वार्षिक सभा

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन प्रेस क्लबची वार्षिक सभा नुकतीच पार पडली. बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. विद्यमान कार्यकारिणीला एक वर्षासाठी कार्यकाळ वाढवून देण्यात आला.

यामध्ये अध्यक्ष, भारत चोगले, उपाध्यक्ष, सूर्यकांत पांढरकामे, मंगेश निंबरे कारिवणे, सचिव, सावन तवसाळकर, खजिनदार, वैभव तोडणकर, विजय गिरी, दत्तात्रय पांढरकामे, सदस्य, प्रसाद नाझरे, अभय पाटील, संजय मांजरेकर, संतोष शिलकर, संतोष रेळेकर, संतोष चौकर, खलील आराई, अबिद करदमे, आनंद जोशी यांचाही समावेश आहे.

---

## एअर फोर्स प्रकल्पाच्या ड्रोन सर्व्हेला विरोध

**॥ कोळवाडी येथे बैठकीत निर्धार**



। पनवेल । वार्ताहर ।

तळोजा औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून तळोजे जवळीलपरिसरातीलतालुक्यातील पाले बुद्रुक, कोळवाडी, पडघे, वळवली, वलप, फणसवाडी आणि सागवाडी येथील जमिनींवर एअर फोर्सचा प्रकल्प आणण्याचे काम सुरु असून याठिकाणी होणाऱ्या सर्व्हेबाबत ग्रामस्थांची एकदिशा ठरविली जावी यासाठी येथील विविध पक्षांच्या स्थानिक नेत्यांसह ग्रामस्थांच्या पंचकृषी शेतकरी वर्गाची बैठक कोळवाडी येथील संजय गांधी स्मारक विद्यालयामध्ये पार पडली. यामध्ये प्रकल्पाच्या ड्रोन सर्व्हेला ग्रामस्थांनी विरोध दर्शविला आहे.

या बैठकीमध्ये शिवसेनेचे योगेश तांडेल, शेकाप नेते काशिनाथ पाटील, काँग्रेसचे हेमराज म्हात्रे, भाऊशेठ भोईर, पांडुशेठ भोईर, प्रकाश म्हात्रे, हिरशेठ तांडेल, पाठेमामा, सुरेश भोईर, ज्ञानेश्वर भोपी, अर्जुन म्हात्रे, प्रमोद ठक्कर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

बैठकीदरम्यान प्रभाकर भोईर यांनी शासनाच्या ड्रोन सर्व्हेला विरोध दर्शवित याबाबत पुढचे पाऊल उचलणे गरजेचे असल्याच्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या या मागणीवर ग्रामस्थांनी एकमत दर्शविल. योगेश तांडेल यांनी याबाबत बैठक लावून ग्रामस्थांच्या अडचणी उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांना समक्ष बोलावून सोडविल्या जातील यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे मत व्यक्त केले.

## खडीने भरलेला ट्रक घेऊन चालक फरार

। पनवेल । वार्ताहर ।

शासनाचा महसूल बुडवून अवैध मार्गाने खडीची वाहतुक करून घेऊन जाणाऱ्या ट्रक चालकाने महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना चकमा देऊन खडीने भरलेला ट्रक घेऊन पलायन केल्याचा प्रकार तळोजा येथे घडला आहे. रॉयल्टी तपासणी पथकाने अडवून ट्रक चालक जयहरी सिंगकडे चौकशी केली असता त्याच्याकडे खडीची रॉयल्टी व परवाना नसल्याचे सांगितले. महसूल अधिकाऱ्यांसोबत हुज्जत घालण्यास सुरुवात केली असता खडी घेऊन जाणाऱ्या ट्रक चालकाने महसूल अधिकाऱ्यांची नजर चुकवून पलायन केले.

## शिळफाटा परिसरात सहा लाखांचे अंमली पदार्थ जप्त

। पनवेल । वार्ताहर ।

अंमली पदार्थ विरोधी कक्ष गुन्हे शाखेच्या पथकाने तळोजा परिसरातील शिळफाटा येथून जवळपास ५ लाख ८९ रुपयांचा अंमली पदार्थ, रोखरक्कम व इतर ऐवज असा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याप्रकरणी दोघांना ताब्यात घेतले आहे.

अमिन जाल मोहम्मद खान व बदरली इर्शाद अहमद शेख यांच्याकडे मेथाक्युलॉन हा अंमली पदार्थ त्यांच्याकडे असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्ष गुन्हे शाखा यांना मिळताच वपोनि बी.एस. सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक विजय शिंगे, पोलिस हवालदार रमेश उटगीकर आदींच्या पथकाने रूबी मार्केट गेटजवळ गुरूदत्त देव मंदिरासमोर छापा टाकून सदर मालाची विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या या दोघा इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जवळपास ५ लाख ८९ रुपयांचा अंमली पदार्थ, रोखरक्कम व इतर ऐवज असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या गुन्ह्याची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

---

## नागावच्या नाईक कुटुंबाचे सांत्वन



**पंडित पाटील यांच्याकडून आठवणींना उजाळा**

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

नागाव येथील कृष्णा नथु नाईक यांचे नुकतेच निधन झाले असून, शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार पंडित पाटील यांनी त्यांच्या घरी सांत्वनपर भेट दिली आहे. कृष्णा नाईक हे दादा या नावाने विभागाला परिचित होते.

स्व.दत्ता पाटील यांच्यासोबत त्यांनी दीर्घकाळ शेकपक्षाचे काम केले होते. तर स्व.प्रभाकर पाटील यांचे तर ते निकटवर्तीय सहकारी म्हणून ओळखले जात. शेतकरी कामगार पक्षाच्या या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या पायाला अडीच वर्षांपूर्वी दुखापत झाल्यापासून ते घरीच असत. काही दिवसांपूर्वी त्यांची प्राणज्योत मालवली.

पंडित पाटील यांनी कुटुंबाचे सांत्वन करताना त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी शेकापचे जि.प.माजी सदस्य कबन नाईक, शेकाप पुरोगामी युवक संघटना तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे, नागाव ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत आठवले, राजाभाऊ म्हात्रे, कृष्णा म्हात्रे, केशव नाईक हे उपस्थित होते.

## आनंद सुगवेकर यांचे निधन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील शिक्षण क्षेत्रातील ज्येष्ठ कार्यकर्ते आनंद तात्यासाहेब सुगवेकर यांचे निधन झाले आहे. त्यांच्यावर नेरळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



नेरळ ग्रा.पं.मध्ये सदस्य म्हणून काम केले आहे. अभिनव ज्ञान मंदिर संस्थेत कार्यवाह म्हणून काम केले आहे त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि दोन मुली तसेच सख्खे भाऊ आणि त्यांचे कुटुंबीय असा परिवार आहे.

## काँग्रेसच्या मजबुतीकरणासाठी सदस्य व्हा

**आर.सी.घरत यांचे आवाहन**

। पनवेल । प्रतिनिधी ।

सध्या देशात पंतप्रधान मोदी यांचा जो मनमानी कारभार सुरू आहे, त्याला आवर घालण्यासाठी संपूर्ण देशात काँग्रेस पक्ष मजबूत होणे ही काळाची गरज आहे याची जाणीव ठेवून सर्वसामान्य जनतेने काँग्रेस पक्षाचे सदस्यत्व स्वखुशीने घ्यावे असे आवाहन पनवेल शहर, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर. सी. घरत यांनी एका पत्रकाव्दारे केले आहे. घरत यांनी निवेदनातून, सरकारी कंपन्यांचे सुरु असलेले खाजगीकरण, वाढती बेरोजगारी महिलांवर होणारे अत्याचार, आर्थिक स्थिती आदी बाबींवर आवाज उठविण्याचे काम काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह प्रियंका गांधी यांनी जो आत्मविश्वास निर्माण केला त्याला पाठिंबा देण्यासाठी सदस्य नोंदणीसाठी येतील त्यांना सहकार्य करून काँग्रेस पक्षाचे सदस्यत्व स्वीकारावे व काँग्रेस मजबूत करून लोकशाही वाचविण्याच्या हातभार लावावा असेही आवाहन केले आहे.

---

## एक लाख रुपयांसाठी आईने मुलाला विकले

**आारोपीसह मुलाला घेतले ताब्यात**

। पनवेल । वार्ताहर ।

*'माता न तू वैरिणी' या उक्तीचा प्रत्यय देणारी संतापजनक घटना पुण्यात उघडकीस आली आहे. चक्क आईनेच पोटच्या गोळ्याला एक लाख रुपयांसाठी विकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.*

*चार वर्षाच्या मुलाला विकल्यानंतर आईने पोलीस स्टेशनमध्ये अपहरणाची तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी या घटनेचा तपास सुरु केल्यानंतर अनेक धक्कादायक माहिती उघड झाली. पुण्यातील कोथरूड परिसरात ही घटना झाली, परंतु सदर मुलाला पळवून नेणारे दाम्पत्य हे पनवेल तालुक्यातील बोर्ले या गावात वास्तव्यास असल्याची माहिती कोथरुड पोलिसांना मिळताच त्यांनी तातडीने पनवेल तालुका पोलिसांशी संपर्क साधून याबाबत माहिती दिली असता अथक परिश्रम करून अवघ्या २ तासात सदर मुलाला आरोपींसह ताब्यात घेऊन त्यांना कोथरुड पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहे.*



*रेश्मा सुतार आणि तक्रार करणारी प्रियंका पवार यांच्या संगनमत व कट करुन चिमुकल्याचे अपहरण केलं. हा मुलगा तुकाराम निंबळे, मावळ याच्या मध्यस्थीने पनवेल तालुक्यातील बोर्ले गावात राहणाऱ्या चंद्रकला माळी आणि भानुदास माळी यांना एक लाख रुपयांना विकला. पोलिसांनी तात्काळ या दोघांचा शोध घेतला. पनवेल तालुका पोलीस पथकाने त्या ठिकाणी पाठवून चंद्रकला माळी आणि भानुदास माळी या दोघांना ताब्यात घेत मुलांबाबत विचारपूस केली. हा मुलगा एक लाख साठ हजार रुपयांना दिपक म्हात्रे यांना विकल्याचे त्यांनी सांगितले.*

*त्यानंतर त्याच्या घरी जावून आरोपीला ताब्यात घेत अन् मुलाची सुटका केली. आठ जणांना ताब्यात घेतलं असून त्यांना पोलीस कोठडी देण्यात आली.*


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही






वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

श्री. धीरज धनंजय म्हात्रे, वाढदिवसानिमत्त, झिराड, अलिबाग

## संपादकीय

# कडेलोट

सोमवारी संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले भाषण ऐकणाऱ्या तमाम देशवासीयांना दोन प्रश्न पडले. पहिला हा की पंतप्रधानांना आपण संसदेत बोलत आहोत, निवडणूक प्रचारात नाही, याचे भान आहे की ते खरोखरीच त्यांच्या मूलभूत इलेक्शनजीवी प्रवृत्तीनुसार उत्तर प्रदेश व अन्य विधानसभा निवडणुकींच्या प्रचारात असल्याने संसदेचे भान विसरून भाषण करीत आहेत? दुसरा प्रश्न असा की संसदेत खोटे बोलण्यावर काही निर्बंध आहेत की नाहीत; की तेथे काहीही बरळता येते? कारण, त्यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल प्रचलित प्रथेप्रमाणे आभार मानणारे भाषण करणे अपेक्षित होते. त्याला त्यांनी संपूर्ण बगल देऊन आपल्या खास खोटेनाटे रेटून बोलण्याच्या निवडणूक प्रचाराच्या शैलीत काँग्रेस तसेच अन्य विरोधी पक्षांवर टीका केली. काँग्रेसला त्यांनी, 'तुमच्या वृत्तीवरून असे दिसते की पुढील १०० वर्षे तरी सत्तेवर यायचे नाही', असा टोला लगावला. काँग्रेस कशी गेल्या काही वर्षांत, दशकांत गोवा, त्रिपुरा, उत्तरप्रदेश, बंगाल, बिहार, तामिळनाडू आदी राज्यांतून हद्दपार झाली, याचा त्यांनी तपशील मांडला. या माहितीकडे तटस्थपणे पाहिल्यास बऱ्याच अंशी तथ्य आहे. मग अशा जी शंभर वर्षे सत्तेवर येऊ शकत नाही, ज्याला सगळ्या राज्यांनी गेली अनेक दशके सत्तेपासून लांब ठेवले आहे, ज्याची संख्या संसदेत विरोधी पक्षाच्या पात्रतेतही बसत नाही अशी जेमतेम पन्नासच्या आसपास असलेल्या काँग्रेसवर टीका करण्याचे कारण काय? तेही सत्तारूढ भाजपाकडे अजस्त्र बहुमत असताना? म्हणूनच मोदी यांच्या काँग्रेस पक्षावरील प्रदीर्घ टीकेनंतर काँग्रेसने केवळ 'खौफ अच्छा हैं!' अशा केवळ तीन शब्दांत प्रत्युत्तर दिले. या निमित्ताने स्वतंत्र भारताच्या इतिहासात देशाने पहिल्यांदाच रेटून धडधडीत खोटे बोलणारा पंतप्रधान पाहिला. नरेंद्र मोदी यांच्या नावावर अनेक पहिल्यांदाचे बिरुद लागलेले आहे, त्यात हेही जमा झाले. काँग्रेस पक्षावर गेली सात वर्षे सतत टीका करीत, त्यात वेळोवेळी पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना सामील करून घेत आपले अपयश आणि जनतेविरोधी व भांडवलशाही धार्जिणी धोरणे झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न करणे ही त्यांची पद्धती आता जनतेला नीट माहिती झाली आहे. संसदेत खोटी माहिती देता येत नाही आणि त्यामुळे तेथे देण्यात येणारी माहिती देशासाठी शंकेपलिकडची असते. त्या विरुद्ध कायदाही आहे. परंतु गलितगात्र बनलेला विरोधी पक्ष त्या कायद्याचा वापर करण्याच्या परिस्थितीत नाही. काही दशकांपूर्वी इंदिरा गांधी पंतप्रधान असताना अशीच राजकीय स्थिती होती. तेव्हा इंदिरा गांधी यांची ताकद म्हणजे कमकुवत विरोधी पक्ष असल्याचे राजकीय विश्लेषण केले जायचे. तशीच पुनरावृत्ती आता नरेंद्र मोदी यांच्या काळात झालेली दिसते. परंतु तरीही असे पंतप्रधानांनी बेधडक खोटे बोलणे आता पहिल्यांदाच घडले आहे. काँग्रेसवर तोंडसुख घेताना त्यांनी काँग्रेसने कोरोना देशभर पसरवला असा आरोप केला. कोरोनाच्या पहिल्या लाटेत देश टाळेबंदीचे पालन करत असताना महाराष्ट्रातील काँग्रेस नेते मात्र मुंबईच्या रेल्वे स्थानकांवर उभे राहून मुंबई सोडून जाणाऱ्या मजुरांना रेल्वेची तिकिटे देत होते, असे ते म्हणाले. काँग्रेसने लोकांना स्थलांतरित होण्यासाठी प्रवृत्त केले, असा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रावर असलेले परप्रांतीयांचे ओझे कमी होईल, तुम्ही इथून निघून जा, तुम्ही उत्तर प्रदेश, बिहारचे आहात, तिथे जाऊन कोरोना पसरवण्याचे काम करा, असा संदेश हे नेते देत होते, असे सांगतानाच त्यांनी काँग्रेसने लोकांना राज्याबाहेर काढण्याचे मोठे पाप केले आणि देशभर कोरोना पसरवला असा आरोपही त्यांनी केला. वास्तविक, नरेंद्र मोदी यांनी अचानक लागू केलेल्या टाळेबंदीमुळे लाखो मजूर व गोरगरिबांचे हाल झाले होते. त्यांच्या जेवणाची व राहण्याची व्यवस्था काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडी सरकारने केली होती. अडकून पडलेल्या ५० हजार मजुरांना काँग्रेस पक्षाने स्वखर्चाने आपापल्या गावी परत पाठविले होते. तसेच, लॉकडाऊन जाहीर केल्यानंतर केंद्र सरकारने अनेक श्रमिक ट्रेन चालविल्या. त्याबद्दल जाहिरातही केली आणि संसदेत माहितीही दिली. मोदी यांनी केवळ निवडणुका असलेल्या राज्यांची नावे घेतली आणि जेथे आपल्या पक्षाला सत्ता मिळाली नाही, त्या राज्यांवर टीका केली. वास्तविक, सर्वाधिक ट्रेन या गुजरात राज्यातून सुटलेल्या होत्या. परंतु सत्य कोणाला हवे आहे? देशाचा पंतप्रधान खुद्द संसदेत सत्याचा कडेलोट करत असताना त्याची जपणूक कोण करेल, हा खरा प्रश्न आहे.

# वाईन, हेल्थ ड्रिंक?



जयंत माईणकर

> शेतकऱ्यांच्या वाया जाणाऱ्या फळांपासून वाईन बनावी आणि शेतकऱ्यांनाही पैसे मिळावे ही मागणी अनेकांकडून केली जात आहे. माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनीही गुळ आणि मोहाची फुल यापासून वाईन बनवावी ही मागणी केली आहे.

महाविकास आघाडी सरकारने वाइन सुपर मार्केट, किराणा दुकानात उपलब्ध होईल हे सांगून एका नव्या वादाला तोंड फोडल आहे. विरोधी पक्ष भाजप याचा कडाडून विरोध करत आहे.

वाईन शॉप हे नाव न ठेवता त्या जागी सरळ दारूचे दुकान, लिकर शॉप हे नाव द्यावं ही पण मागणी जात आहे. वाईनला हेल्थ ड्रिंक मानाव. वाईन, बिअर, दारू यात फरक करावा.

शेतकऱ्यांच्या वाया जाणाऱ्या फळांपासून वाईन बनावी आणि शेतकऱ्यांनाही पैसे मिळावे ही मागणी अनेकांकडून केली जात आहे. माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनीही गुळ आणि मोहाची फुल यापासून वाईन बनवावी ही मागणी केली आहे. महाविकास आघाडीचे सर्वे सर्वा शरद पवार आणि स्व. विलासराव देशमुख यांनीही आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात वाईन किराणा दुकान, सुपर मार्केट मध्ये विकली जावी यासाठी प्रयत्न केला होता. शेवटी तो निर्णय उद्धव ठाकरेंच्या काळात घेतला गेला.

वाइन आणि लिकरमध्ये काय फरक प्रथम समजून घेतला पाहिजे. वाइन हे अल्कोहोलयुक्त पेय आहे जे आंबलेल्या द्राक्षाच्या, फळांच्या रसापासून बनवले जाते. ज्यात अल्कोहोलचे प्रमाण १५ टक्क्यांपेक्षा कमी असते. वाइन डिस्टिलेशनच्या प्रक्रियेतून जात नाही. बोर्डो, किआन्ती, मेर्लोत, पिनो नॉयर, कॅबरनेट आणि रिओजा हे काही प्रकारचे वाइन आहेत. याऊलट दारुमध्ये अल्कोहोलचे प्रमाण ३५% पेक्षा जास्त आहे. रम, जिन, व्हिस्की, ब्रँडी, स्कॉच आणि व्हा डका हे काही प्रकारचे मद्य आहेत. दारू किंवा अल्कोहोल मिश्रीत पेय पिण्यासाठी वयोमर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार वयाची २१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पाच ते आठ टक्के अल्कोहोलच प्रमाण असणाऱ्या बार्ली वॉटर पासून तयार केलेलं बिअर हे पेय पिण्याचा कायदेशीर अधिकार असतो तर २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर दारू पिण्याची परवानगी दिली जाते. अर्थात त्यासाठी वयाचा दाखला देऊन ९५० रुपये भरून परवाना काढला जातो. कायमच्या परवण्यासाठी १८५० रुपये लागतात. परवानाधारक व्यक्ती शासनमान्य दुकानातून देशी, विदेशी मद्याच्या १० बाटल्या खरेदी करू शकतो आणि स्वत:च्या घरी ठेवू शकतो. याशिवाय दोन रुपयात देशी दारुसाठी दैनिक परमिट दिल जातं तर विदेशी मद्यासाठी पाच रुपयात.



जगात फ्रेंच लोक वाईन पिण्यात अग्रेसर आहेत. त्यांच्यामधे हृदयविकारांचे प्रमाण लक्षणीय रित्या कमी आहे. यालाच फ्रेंच पॅराडॉक्स असे म्हणतात. यावर अधिक संशोधन केल्यावर असे आढळून आले की, लाल वाईन करण्यासाठी लाल द्राक्षांच्या बिया वापरल्या जातात. आणि त्यात असलेले Quercetin, Tannins आणि Proanthocyanidins हे antioxidant अशी किमया करु शकतात.

वाईन शक्यतो जेवणापुर्वी भुक वाढवण्यासाठी, तसेच जेवणाबरोबर व नंतर पचनक्रिया सुलभ करण्यासाठी घेतात. कुठल्या वेळी कश्या प्रकारची वाईन घ्यायची, याचे काही संकेत व आडाखे ठरलेले आहेत. त्याप्रमाणे जेवणाबरोबर वाईन घेतातच, पण त्याबरोबर प्रत्यक्ष जेवण शिजवण्यासाठी देखील वाईन वापरतात. व्हिनेगर म्हणून ही वापर केला जातो. मुरवण्यासाठी, पदार्थ टिकवण्यासाठी सुद्धा याचा वापर केला जातो. वाईन द्राक्षांपासुन बनवतात. हिरव्या द्राक्षांची पांढरी तर काळ्या द्राक्षाची रेड वाईन. द्राक्षावर असणाऱ्या यीस्टमुळे त्यापासून वाईन बनवणे सोपे जाते. पण फक्त द्राक्षापासूनच वाईन बनते असे नाही. इतर फळांपासून वाईन बनवताना जरुरीप्रमाणे वेगळी यीस्ट वापरावी लागते. हे यीस्टचे जिवाणु साखरेचे विघटन करुन त्यापासून कार्बन डायऑक्साईड व अल्कोहोल निर्माण करतात.

वाईनचे रंगावरुन तीन मुख्य प्रकार लाल, पांढरी आणि गुलाबी. हे रंग फळांच्या मूळ रंगामुळे आलेले असतात किंवा करपलेली साखर म्हणजेच कॅरामेलमुळे आलेले असतात. फळांच्या बरोबर स्वादासाठी काही मसाले म्हणजेच, बडीशेप, लवंगा किंवा दालचिनी वापरली जाते. आले किंवा जायफळ देखील वापरतात.

वाईन जेवणानंतर गोड पदार्थाबरोबर आणि शाम्पेन ही खास प्रसंगी दिली जाते. वाईनमधील अल्कोहोलच प्रमाण बिअर आणि इतर हार्ड ड्रिंक्सच्या मधलं असल्यामुळे वाईन पिण्यासाठी २२ वयोमर्यादा ठेवण्यास हरकत नसावी.

भाजप आता या निर्णायला मध्यप्रदेश म्हणून विरोध करत आहे. गंम्मत म्हणजे भाजप शासित बाजूच्याच मध्यप्रदेश मधे दारू संदर्भात अगदी मुक्त धोरण असतांना तीच मंडळी महाराष्ट्रात मात्र विरोधाचे राजकीय नाटक करत आहेत.

ज्वारीपासून उत्तम प्रकारचे मद्य बनविता येते व ते स्कॉच व्हिस्कीच्या दर्जाचे असते. ज्वारी, मक्यापासून मद्य बनविण्याची पद्धत वेगळी आहे. ती शिजवावी लागते आणि वीजही बरीच लागते. उत्पादनखर्च जास्त येतो. पण विदर्भात अनेक वेळा काळी ज्वारी नंतर वाया जाते. धान्य, फळे वाया जाण्यापेक्षा त्यापासून मद्यार्क, वाईन, बिअर बनवण्यास काही हरकत नसावी?

आपल्या देशात दारुसाठी एकच नियम नाही. महाराष्ट्रात दारू खुली असली तरीही वर्धा किंवा काही काळासाठी चंद्रपुर जिल्ह्यासाठी वेगळे नियम होते. गुजरात संपूर्ण दारूबंदी आहे आणि म्हणूनच की काय गुजरातच्या सिमेला लागून असलेल्या मध्यप्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, दमण, दिव या भागात मोठ्या प्रमाणात दारू विक्री होते. बिहार, हरियाणा यासारख्या भागात अधूनमधून राजकीय कारणांसाठी दारूबंदी केली जाते. १९६० पासून महात्मा गांधींना आदरांजली म्हणून संपूर्ण गुजरात राज्यात दारूबंदी जाहीर आहे. मात्र या निर्णयामुळे राज्य सरकार ३००० कोटी रुपयांच्या महसूली उत्पन्नाचे नुकसान सध्या सहन करत आहे. मात्र अनेक रईस यामुळे कसे धनवान झाले हे रईस हा चित्रपट ज्यांनी पाहिला त्यांना कळले असेल.

गुजरातमध्ये आत्तापर्यंत सुमारे ३० वर्षे काँग्रेसने राज्य केले तर पाच वर्षे जनता दलाने आणि गेली २७ पूर्ण भाजपच शासन आहे. मात्र कोणत्याही पक्षाने दारूबंदी उठवण्याचा प्रयत्न केला नाही. आणि त्यामुळें विकल्या जाणाऱ्या बेकायदेशिर विषारी दारू विक्रीत अनेकांचा मृत्यू होतो. या दारूबंदीतला फोलपणा लक्षात आल्यामुळेच की काय आज गुजरातमध्ये एकूण ६६ अधिकृत दारूची दुकाने आहेत. ही सर्व दुकाने मुख्यत्वे मोठ्या शहरात आहेत. संपूर्ण राज्यात ३०,००० परमिट होल्डर्स असून त्यातील ५,००० परकीय नागरिक आहेत. परमिटसाठी बिअर, वाईन आणि लीकर यासाठी वेगळे वयोगट करून देशभर एकच कायद्याने केवळ परमिट होल्डर्सना दारू द्यावी. परमिट ची सक्ती केल्यामुळे देशाच महसुली उत्पन्नही वाढेल. अर्थात त्यासाठी परमिट देण्याची पद्धत अधिक सोपी केली पाहिजे. आणि जशी बिअर साठी कमीत कमी वयोमर्यादा २१ आणि हार्ड लीकर साठी २५ आहे त्याचप्रमाणे वाईनसाठी हेल्थ ड्रिंक समजून ही वयोमर्यादा २२ करण संयुक्तिक असेल!

तीन टक्के अल्कोहोल मिश्रित बिअर सुद्धा भारतीय हवामानाला पोषक आहे. तशा बिअरला भारतात मोठ मार्केट मिळेल. त्यामुळे बिअरचीही विक्री किराणा दुकानातून अथवा सुपर मार्केट मधून करण्यास हरकत नसावी!

तूर्तास इतकेच!

# बदलाच्या दिशेने पाऊल

विविध प्रकारच्या धार्मिक कार्यात विधवा महिलांना बाजूला ठेवण्याच्या जुन्या रितीरिवाजाला फाटा देत आता सर्वत्र संक्रांतीचे वाण देऊन या महिलांना सुवासिनीचा मान देण्यात येत आहे. विविध संघटनांच्या माध्यमातून झालेल्या कार्यक्रमाद्वारे जुन्या चालीरितींना मूठमाती देण्यात येत आहे. विधवांना हळदी कुंकवाचा सुवासिनीचा मान देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात गावातील महिलांनी सहभागी होत सामाजिक बदलाच्या दिशेने पाऊल टाकले आहे. लग्नानंतर अल्पावधीत नियतीने हिरावून घेतलेले सौभाग्याचे लेणे आणि पती निधनानंतर विधवा म्हणून समाजाकडून मिळणारी वागणूक ही अत्यंत हिन असते. त्या वागवणूकीला फाटा देत हळदी कुंकवाचे वाण देऊन विधवांना सन्मान देण्याचे कार्य हाती घेतले आहे. गेल्या काही वर्षांपासून वैधव्याचे दुख विसरुन अनिष्ठ रुढी-परंपरा बाजूला ठेवत विधवा आपल्या पायावर उभ्या राहून आपले चरितार्थ स्वतः चालवित आहेत. पतीच्या निधनानंतर काही स्त्रीया आपले शिक्षण पूर्ण करून चांगल्या पदावर कामालाही लागत आहेत. विधवा स्त्री कितीही पुढे गेली तरी धार्मिक कार्यक्रमात विधवांना प्रवेश दिला जात नाही. सामान्यपणे जगणे या महिलांना नाकारले जाते. तसेच मकरसंक्रांतीला सर्वत्र हळदी-कुंकवाचे कार्यक्रम घेतले जातात. या कार्यक्रमात महिला सुवासिनीदेखील प्रथेनुसार विधवांना टाळतात. ही प्रथा बंद व्हावी या उद्देशाने आता सर्वत्र विधवांसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम घेतले जात आहे. या कार्यक्रमात अनेक महिला सहभागी होत हा कार्यक्रम यशस्वी करताना दिसत आहेत. त्यांनीही आपले जीवन आनंदाने जगावे, इतर स्त्रीयांप्रमाणे समाजात वावरावे यासाठी हा एक चांगला प्रयत्नच म्हणावा लागेल. खरे तर विधवांना न्याय देण्यासाठी निर्धारपूर्वक असे कार्यक्रम घेण्यात येत असून या माध्यमातून एका चुकीच्या परंपरेला तिलांजली देण्यात येत आहे.

वार-वार
नेहा कवळे

# जोडीदार शोधताना सावधान

ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून मोठी वाढ झाली आहे. सध्याच्या युगात ऑनलाईन जोडीदार शोध मोहिमेला इतके महत्व आले आहे की वधू किंवा वर शोधण्यासाठी ऑनलाईन साईटचा आधार सर्रास घेतला जातो. मात्र त्यावर संबंधितांनी टाकलेली माहिती ही खरीच असते असे नाही. त्यामुळे प्रोफाइलवर दिसणारा चेहरा व माहिती खरी समजल्याने अनेकांची फसवणूक होत आहे. आता सायबर क्रिमिनल्स ऑनलाईन मॅचमेकिंग वेबसाइटला देखील निशाणा बनवत आहेत. जे जोडीदार शोधण्यासाठी आणि लग्नासाठी मॅट्रिमोनी वेबसाइट्सचा वापर करतात, त्यांनी नक्कीच सावध राहिले पाहिजे. मॅट्रोमोनिअल वेबसाइटवर जोडीदार शोधताना ओळख फसव्या व्यक्तीबरोबर होऊन मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागते. मॅट्रोमिनी स्कॅम्सचे प्रकार वाढले असून, पुरूषांबरोबर महिला देखील या जाळ्यात अडकत आहेत. मॅनिस्ट्री ऑफ होम अफेअर्सने आपल्या सायबर-सेफ्टी आणि सायबर सायकर सिक्युरिटीचे ट्विटर हँडल सायबर दोस्तवरून युजर्सला काही सूचना दिल्या आहेत. यात युजर्सला मॅट्रोमोनी वेबसाइट्सवर जोडीदाराचा शोध घेताना काय करावे आणि काय करू नये याबद्दल सांगितले आहे. मॅट्रोमोनियल वेबसाइट्सवर रजिस्टर करण्यासाठी नवीन ईमेल आयडीचा वापर करावा. यासोबतच मॅट्रोमोनियल वेबसाइट्सवर फोटो, फोन नंबर आणि पत्ता यासारख्या खाजगी गोष्टी शेअर करू नये. कोणत्याही मॅट्रोमोनी वेबसाइट्सवर रजिस्ट्रेशन करण्याआधी त्याविषयी संपुर्ण माहिती जाणून घेतली पाहिजे. यासाठी वेबसाईटचे रिव्ह्यूज वाचावे आणि कोणत्याही वेबसाइटवर विश्वास ठेवण्याआधी मित्र आणि कुटूंबाचा सल्ला नक्की घ्यावा. मॅट्रोमोनियल वेबसाइट्सद्वारे फ्रॉड करणारे कोणतीही इमर्जेंसी असल्याचे सांगून पैसे खात्यात टाकण्यास सांगतात. तसेच गिफ्ट पाठवले असून त्यासाठी टॅक्स मनी ट्रान्सफर करण्यास सांगून फसवणूक करतात.



# भगवद्गीता

नित्यो नित्यानां चेतनश्वेतनानाम् एको बहूनां यो विदधाति कामान् ।
तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां शान्तिः शाश्वती नेतरेषाम् ।।

अर्जुनाला जे वैदिक सत्य सांगण्यात आले ते जगातील सर्व व्यक्तींनाही, विशेष करुन ज्यांच्याकडे वास्तविकपणे अतिशय तोकडे ज्ञान आहे, पण स्वतः विद्वान असल्याचा देखावा करतातस, त्यांना सांगण्यात आले आहे. भगवान स्पष्टपणे सांगतात की, ते स्वतः अर्जुन आणि युद्धभूमीवर जमलेले राजे या सर्वांचे शाश्वत वैयक्तिक अस्तित्व असते आणि बद्ध अथवा मुक्त या दोन्ही अवस्थांमधील सर्व जीवांचे भगवंत हेच नित्य पालनकर्ता आहेत. पुरुषोत्तम श्रीभगवान हे परमपुरुष आहेत आणि भगवंतांचा नित्य सहचर अर्जुन व उपस्थित राजे हे सर्व शाश्वत जीवात्मा आहेत. भूतकाळात ते अस्तित्वात नव्हते असे नाही आणि ते शाश्वत नित्य व्यक्ती राहणार नाहीत असेही नाही. त्यांचे व्यक्तित्व भूतकाळात अस्तित्वात होतेच आणि हे व्यक्तित्व भविष्यकाळातही अखंडपणे चालू राहीलच म्हणून कोणाबद्दलही शोक करण्याचे कारण नाही.

मायावादी तत्वज्ञान सांगते की, मोक्षानंतर जीवात्मा हा मायेच्या आवरणापासून अलग होतो आणि निर्विशेष ब्रह्ममध्ये विलीन होऊन आपले अस्तित्व गमावतो; पण या सिद्धांताला सर्वश्रेष्ठ अधिकारी भगवान श्रीकृष्णांनी या ठिकाणी पुष्टी दिली नाही. तसेच फक्त बद्धावस्थेतच आपण वैयक्तिक अस्तित्वाचा विचार करतो या सिद्धांतालाही या ठिकाणी पुष्टी मिळत नाही. उपनिषदांत सांगितल्याप्रमाणेच या ठिकाणी श्रीकृष्ण सुद्धा सांगतात की, भविष्यकाळातही भगवंत आणि इतरांचे स्वतंत्र अस्तित्व निरंतर चालूच राहील. श्रीकृष्णांचे हे विधान अधिकृत आहे, कारण श्रीकृष्ण भ्रमित होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जर जीवांचे स्वतंत्र अस्तित्व ही वास्तविकता नसती तर भविष्यकाळातील जीवाच्या स्वतंत्र व्यक्तित्वावर श्रीकृष्णांनी इतका जोर दिलाच नसता. यावर प्रतिवाद करण्यासाठी मायावादी म्हणू शकतील की, श्रीकृष्णांनी स्वतंत्र व्यक्तित्वाबद्दल सांगितलेले वचन अध्यात्मिक नसून भौतिक आहे. जरी हा युक्तिवाद मान्य केला की व्यक्तित्व हे भौतिक आहे, तरी श्रीकृष्णांच्या स्वतंत्र व्यक्तित्वाबद्दल काय? श्रीकृष्ण आपल्या भूतकाळातील स्वतंत्र अस्तित्वाबद्दलही निश्चिती देतात. श्रीकृष्णांनी आपले स्वतंत्र व्यक्तित्व अनेकविध रितींनी निश्चितपणे सिद्ध केले आहे आणि निर्विशेष ब्रह्म हे त्यांच्याहून गौण आहे असे घोषित करण्यात आले आहे. श्रीकृष्णांनी आपले स्वतंत्र व्यक्तित्व सर्वत्र कायम ठेवले आहे. जर त्यांचा अहंकारी सामान्य बद्ध जीव म्हणून स्वीकार केला तर त्यांनी सांगितलेल्या भगवद्गीतेला प्रमाणित शास्त्र म्हणून काहीच किंमत राहत नाही. मानवी दुर्बलतेच्या चार दोषांनी युक्त सामान्य मनुष्य श्रवणयोग्य ज्ञानाबद्दल शिक्षण देण्यास असमर्थ आहे. भगवद्गीता ही सामान्य अशा साहित्यातून श्रेष्ठ आहे. कोणत्याही भौतिक जडवादी पुस्तकाची भगवद्गीतेशी तुलना होऊच शकत नाही. जेव्हा एखादा श्रीकृष्णांना सामान्य मनुष्य म्हणून स्वीकारतो तेव्हा भगवद्गीतेचे सर्व महत्व नाहीसे होते. मायावादी असा युक्तिवाद करतात की, या श्लोकात जे अनेकत्व सांगितले आहे ते केवळ रुढीला धरुन आहे आणि ते शरीराला उद्देशून सांगण्यात आले आहे; परंतु यापूर्वीच्या श्लोकामध्ये अशा प्रकारच्या शारीरिक संकल्पनेचे पूर्णपणे खंडन करण्यात आले आहे. जीवांच्या शारीरिक संकल्पनेची पूर्वीच निंदा केल्यावर पुन्हा शरीरविषयक रुढीला चिकटून असणारे विधान श्रीकृष्णांद्वारे केले जाणे कसे शक्य आहे? म्हणून स्वतंत्र व्यक्तित्व आध्यात्मिक स्तरावर आधारीत आहे आणि याची पुष्टी श्रीरामानुजाचार्यांच्या इतर आचार्यांनीही केली आहे. गीतेत अनेक ठिकाणि स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, जे भगवंतांचे भक्त आहेत तेच या स्वतंत्र आध्यात्मिक अस्तित्वाबद्दल जाणू शकतात. पुरुषोत्तम श्रीभगवान म्हणून श्रीकृष्णांचा जे द्वेष करतात ते या महान ग्रंथामध्ये खऱ्या अर्थाने प्रवेश करुच शकत नाहीत. अभक्ताद्वारे भगवद्गीतेतील शिकवणूक जाणण्याचा प्रयत्न म्हणजे मधमाशीने मधाची बाटली बाहेरुन चाटल्याप्रमाणेच आहे. ज्याप्रमाणे एखाद्याला मधाची बाटली उघडल्यावाचून त्यातील मधाची चव घेता येत नाही त्याचप्रमाणे या ग्रंथातील चौथ्या अध्यायामध्ये सांगितल्याप्रमाणे भगवद्भक्ताशिवाय इतर कोणीही भगवद्गीता जाणूच शकत नाही. (क्रमशः)

(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)

## लोकसंसद

### अलिबागची अस्मिता चव्हाट्यावर

कालच एक भाषणाची व्हायरल झालेली व्हिडीओ क्लिप गृपवर आली आणि राजकारणाची झालेली दशा पाहून घोर निराशा झाली.शिवसेनेचे विद्यमान सन्माननीय आ. महेंद्र दळवी ज्यांना जनतेने ज्या अपेक्षेने निवडून दिले होते त्या सपशेल फेल ठरल्या आणि एका दुर्दैवी फेऱ्याची सुरुवात झाली अस वाटलं. मी जयंत पाटलांची समर्थक नाही किंवा आमची ओळखही नाही. परंतु, एक नागरिक म्हणून पाहताना त्यांनी कधी राजकीय मर्यादा ओलांडल्याचे दिसत नाही किंबहुना त्याचे पुरावेही नाहीत. आमच्या पिढीने कै. खानविलकर साहेब, कै. प्रभाकर पाटील, कै. अंतुले साहेब, कै.ॲड. दत्ता पाटील, कै.मधुकर ठाकूर, मीनाक्षी पाटील अशा सर्व नेत्यांची भाषणे गर्दीत राहून ऐकलीत. त्यांची राजकीय कारकीर्द पाहिली. अनेक वादग्रस्त प्रसंग झाले. परंतु, अलिबागच्या अस्मितेला धक्का लागेल किंवा अलिबागच्या राजकीय क्षेत्राला काळिमा फासला जाईल असे कोणतेच कृत्य या धुरंधरींनी केल्याचे आठवत नाही. परंतु आज मात्र शरमेने मान खाली घालावी लागेल असे घडत आहे. विद्यमान आमदारांना आपल्या समोर महिलावर्ग बसला आहे याचेही भान नसावे याचे अजब वाटते. विरोधकांवर चिखलफेक करताना आपल्या भाषेच्या आणि अलिबागच्या राजकीय परंपरेच्या परिसीमा ओलांडल्या आणि ओघाओघात आपल्या वाणीने महिलावर्गाला पदरात तोंड लपवावे लागेल असे लांच्छनास्पद कृत्य केले. विशी-पंचवीशीच्या ऐन तारुण्यात आलेल्या तरुणांसमोर अशा प्रकारचे वक्तृत्व झाले तर भविष्यात महाराष्ट्राचा बिहार व्हायला वेळ लागणार नाही.माझी माता भगिनींना विनंती आहे की, अशा अहंकारी, अविवेकी राजकारणापासून आपल्या पाल्यांना दूर ठेवावे. अन्यथा, दारू, सिगारेट या व्यसनासोबत सोनसाखळी आणि बंदूक घेतलेली एक पिढीच गैरमार्गाने राजकारण करायला रस्त्यावर उतरेल. आज आमची मुले भले पुणे मुंबईला शिकली.परंतु, इथे वास्तव्यास असलेल्या मुलांचं भविष्य अशा विकृत राजकीय पुढाऱ्यांच्या आहारी जाऊन उद्ध्वस्त होऊ देऊ नका.ज्या छत्रपती शिवाजी महाराजांचा आधार घेऊन आणि नाव घेऊन हे राजकारण करतात. त्या महाराजांनी कधीही शत्रूला अथवा विरोधकाला अशा विकृत भाषेत संबोधलं नसेल. त्यामुळे हा त्यांचाही अपमान मी समजते. बाकी जनता सुज्ञ आहेच.आमच्या विश्वासाला तडा गेला हे निश्चित. यापुढे असे क्लेशदायक राजकारण पाहायला न मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

-श्रीमती मालती साठे

### युवा खेळाडूंची कामगिरी

वेस्ट इंडिजमध्ये रंगलेल्या अंडर १९ विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघाने इंग्लंडचा सहज पराभव करून विश्वचषकावर भारताचे नाव कोरले. भारतीय युवा संघाचा हा विजय ऐतिहासिक म्हणावा लागेल कारण या विश्वविजयाबोरोबर भारताने पाच वेळा अंडर १९ चा विश्वचषक जिंकण्याचा विक्रम केला अशी कामगिरी करणारा भारताचा युवा संघ हा जगातील पहिला संघ ठरला. त्याचबरोबर सलग चार वेळा अंतिम फेरीत पोहचणारा भारत हा एकमेव देश ठरला. भारताने यापूर्वी २००० साली मोहम्मद कैफच्या नेतृत्वाखाली पहिला विश्वविजय मिळवला होता त्यानंतर २००८ साली विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली भारताने अशी कामगिरी केली. २०१२ साली उनमुक्त चंद आणि २०१८ साली पृथ्वी शॉ यांच्या नेतृत्वाखाली देखील भारताने विश्वविजयी कामगिरी केली. आता यश धुलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने त्याची पुनरावृत्ती करत इतिहास घडवला. यश धुलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ यावेळी सुरवातीपासूनच विश्वविजेतेपदाच्या शर्यतीत होता. अनेकांनी या भारतीय संघाला पहिली पसंती दिली होती तरीही ही कामगीरी सोपी नव्हती कारण भारताप्रमाणेच इंग्लड, ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडीज हे संघही विश्वविजेतेपदासाठी दावेदार होते. भारताने सुरवातही चांगली केली मात्र स्पर्धा अर्ध्यावर आल्यावर भारताच्या गोटात कोरोनाने शिरकाव केला. भारताचे खेळाडू कोरोनाग्रस्त झाल्याने संघाची चिंता वाढली. एकवेळ तर अशी होती की अंतिम ११ खेळाडू कोणते निवडायचे असा प्रश्न संघ व्यवस्थापनाला पडला होता. अशा बिकट परिस्थितही भारतीय खेळाडू डगमगले नाहीत त्यांनी धैर्याने परिस्थितीशी सामना केला. या परिस्थितीचा खेळावर परिणाम होऊ दिला नाही. याबाबत संघ व्यवस्थापनाचेही कौतुक करायला हवे त्यांनी खेळाडूंची मानसिकता बिघडू दिली नाही. भारतीय संघाने सांघिक खेळाच्या जोरावर हा विश्वविजय मिळवला. अंडर १९ मध्ये खेळणारे खेळाडूच पुढे जाऊन देशाचे प्रतिनिधित्व करतात. मोहम्मद कैफ, युवराज सिंग, रॉबिन उथप्पा, शिखर धवन, पियुष चावला, विराट कोहली, पृथ्वी शॉ हे खेळाडू अंडर १९ संघाचीच देणगी आहे. हा विश्वविजय मिळवणाऱ्या संघातील काही खेळाडू भविष्यात भारतीय संघात खेळताना दिसतील. या स्पर्धेत त्यांनी ज्याप्रकारची कामगिरी केली ती पाहून भारतीय क्रिकेटचे भविष्य सुरक्षित हातात असल्याची खात्री पटली. भारताला पाचव्या वेळी विक्रमी विश्वावजितेपद मिळवून देणाऱ्या भारताच्या या युवा संघाचे मनापासून अभिनंदन!

- श्याम ठाणेदार, दौंड



# परशुराम घाटात दरड कोसळली

## जेसीबीसह चालक ढिगाऱ्याखाली | महामार्ग वाहतुकीसाठी बंद

**। चिपळूण । प्रतिनिधी।**
मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटात दरड कोसळून ढिगाऱ्याखाली जेसीबी अडकल्याची धक्कादायक घटना घडली. जेसीबीमध्ये दोन कामगारांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू होते. दरम्यान, दरड खाली कोसळताना एक कामगार पळून गेल्याने तो वाचला असून, दुसरा कामगाराचा या घटनेत मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. डोंगराचा काही भाग आणखी कोसळण्याची भीती असल्याने या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली.

तर या मार्गावरील वाहतूक लोटे-चिरणीमार्गे वळविण्यात आली. घटनास्थळी प्रांताधिकारी व तहसीलदार तसेच पेढे-परशुराममधील ग्रामस्थांनी भेट देऊन पाहणी केली.

गेल्या काही दिवसांपासून परशुराम घाटात चौपदरीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात डोंगर कटाई सुरू असून, यामध्ये काही दिवसांपूर्वी घाटातील दगड पेढे बौद्धवाडी येथील गमरेंच्या घरात घुसून मोठे नुकसान झाले होते. सुदैवाने कोणीही जखमी झाला नाही.

ही घटना ताजी असतानाच मंगळवारी सकाळी परशुराम चौपदरीकरणाचे काम करत असताना कापलेल्या डोंगराची अचानक दरड कोसळली. त्याचा भराव थेट तेथे काम करणाऱ्या जेसीबीवर आल्याने जेसीबी ढिगाऱ्यखाली अडकला. जेसीबीमध्ये दोन कामगार अडकले होते यातील एकाचा जागीच मृत्यू झाला आहे.

या घटनेची माहिती मिळताच प्रांताधिकारी प्रवीण पवार, डीवायएसपी सचिन बारी तहसीलदार जयराज सूर्यवंशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक साळोखे यांनी ग्रामस्थांसमेवत घटनास्थळाची पाहणी केली.

यावेळी ग्रामस्थांनी काही मुद्दे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वास सुर्वे, प्रवीण पाकळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. मात्र, आता परशुराम घाटाच्या डोंगर माथ्यावर असलेल्या घरांना धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत आता प्रशासन कोणती भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

**डोंगरावरील भराव खाली येण्याची शक्यता असल्याने परशुराम घाटातील वाहुतक दोन्ही बाजूने बंद करण्यात आली आहे. काही तास वाहतुक बंद ठेवण्यात आली होती. मात्र, त्याला पर्यायी मार्ग म्हणून कळंबस्ते–चिरणीमार्गे लोटे, अशी व्यवस्था करण्यात आली. वाहतूक बंद असल्याने काही काळ या मार्गावर वाहतूक वाढली होती.**

# चिपळूण हायटेक बसस्थानकाची दुरवस्था

**। चिपळूण । वृत्तसंस्था ।**
राज्यातील हायटेक बसस्थानक म्हणून चिपळूण बसस्थानकाला ओळख मिळेल, असे जाहीर करीत तत्कालीन मंत्र्यांनी बसस्थानक इमारतीचे भूमीपूजन केले. मात्र, चार वर्षे झाली तरी हायटेक बसस्थानक पाहण्याचा योग काही चिपळूणकरांच्या नशिबी नाही. प्रशासनाची उदासिनता, लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्ष याला कारणीभूत ठरत असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया जनमानसातून उमटत आहेत. प्रवाशांच्या सेवेसाठी उभे राहणारे हे बसस्थानक सध्या मोकाट जनावरे, भटकी कुत्री यांच्यासह सर्प, उंदीर आणि घुशींसारख्या प्राण्यांसाठी निवाराच बनला आहे.

रडतरखडत दोन वेळा सुरू झालेले या बसस्थानकाचे काम पुन्हा दीर्घ कालावधीसाठी ठप्प झाले आहे. पाया सुद्धा पूर्णत्वास गेलेला नाही. संपूर्ण साहित्य गंजले आहे तर परिसरात गवत उगवले असून झाडाझुडपांनी पुरत कवेत घेतले आहे. रत्नागिरी बसस्थानकाच्या कामासाठी दहा कोटींचा बूस्टर डोस देऊन उर्जितावस्था देणाऱ्या परिवहन मंत्री परब यांनी चिपळूणच्या बसस्थानकाच्या कामाकडेही नजर टाकावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

५ कोटी खर्च करून उभारण्यात येत असलेल्या या बसस्थानकाला तब्बल २३ प्लॅटफॉर्म, आरक्षण, हिरकणी कक्ष, सीसीटीव्ही, वायफाय व्यवस्था, स्वतंत्र पार्किंग, अद्ययावत विद्युत व्यवस्था, याबरोबरच चालक- वाहकांसाठी स्वतंत्र विश्रांतीगृहे, काँक्रिट पेव्हमेनचा वाहनतळ आदी व्यवस्था करण्यात येणार आहेत.



**कामात सातत्य नाही**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत चिपळूण मध्यवर्ती बसस्थानकाच्या पुर्नबांधणीचे काम हाती घेण्यात आले होते. जुन्या बसस्थानकाच्या जागी हायटेक बसस्थानक उभे करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्यानुसार २३ फेब्रुवारी २०१८ ला तत्कालीन पालकमंत्री रवींद्र वायकर यांच्या हस्ते व लोकप्रतिनिधी, वरिष्ठ, स्थानिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या कामाचे भूमीपूजन झाले होते. जुन्या बसस्थानकाची जीर्ण इमारत तोडून त्यावर सुसज्ज हायटेक बसस्थानक उभारण्यासाठी बांधकाम सुरू करण्यात आले. सुरवातीपासूनच या बसस्थानकाच्या बांधकामाला ग्रहण लागले. निधी नाही, ठेकेदाराचे दुर्लक्ष अशा कारणाने या कामात सातत्य राहिले नाही.**

# अपघातात दुचाकीस्वाराने गमावली आई

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**
मुंबई-गोवा महामार्गावर नेरकेवाडी येथे कोळेकर फार्म हाऊससमोर मोटारीने दुचाकीला पाठीमागून दिलेल्या धडकेत स्वाराच्या पाठीमागे बसलेल्या आईचा मृत्यू झाला असून, स्वार गंभीर जखमी झाला आहे. सविता सखाराम पुजारी (५२) असे मृत महिलेचे नाव असून, दुचाकीस्वाराचे नाव सुहास सखाराम पुजारी (२५) असे आहे.

त्याला अधिक उपचारासाठी कोल्हापूर येथे हलविण्यात आले आहे. सुहास पुजारी हा दुचाकीवर (एमएच-०८-एव्ही-८६९७) आई सविता हिला घेवून नेरकेवाडीकडून राजापूरकडे येत होता. दुचाकी नेरकेवाडी येथील कोळेकर फार्मजवळ आली असता मुंबईकडून गोव्याच्या दिशेने भरधाव वेगात येणाऱ्या मोटारीने (एम-०६-एएस-७६२९) सुहासच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली.



यात सुहास व त्याची आई गंभीर जखमी झाली. दोघांचीही प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी रत्नागिरी येथे हलविण्यात आले.

# नर्सिंग स्कुलमध्ये एनएनएसचा प्रारंभ

**। खेड । प्रतिनिधी ।**
महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ नर्सिंग, घाणेखुंट-लोटे येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा प्रारंभ करण्यात आला आहे. यानिमित्त वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी सोसायटीच्या महाविद्यालय सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. विवेक कानडे, भूलतज्ज्ञ डॉ.अनिल जोशी, संचालक डॉ. श्यामसुंदर भाकरे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.मिलिंद काळे यांची विशेष उपस्थिती लाभली.

# राजापुरात 'कामऱ्या ढोक'चे तीन वर्षांनी दर्शन

**। राजापूर । वृत्तसंस्था ।**
प्रतिकूल वातावरण, वादळ आदी कारणांमुळे दरवर्षी येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांचे तालुक्याच्या सागरी किनारपट्टीवर यावर्षी उशिरा आगमन झाले. याचवेळी केवळ पांढरी मान आणि शरीराचा अन्य भाग काळा अशी अनोखी रंगछटा असलेल्या कामऱ्या ढोक म्हणजेच कांडेसर या दुर्मिळ प्रजातीचा करकोचा सुमारे तीन वर्षांनंतर राजापूर परिसरात पुन्हा एकदा दिसला आहे.

गेल्या महिनाभरापासून शहरामध्ये अर्जुना नदीच्या काठावर आणि आडीवरे परिसरामध्ये त्याचे वास्तव्य असून, अनेक वर्षानंतर त्यांचे झालेले आगमन पक्षीप्रेमींना सुखावणारे ठरले आहे.

सीगल पक्ष्यांसह अन्य स्थलांतरित पक्ष्यांचे तालुक्याच्या सागरी किनारपट्टीवर दरवर्षी आगमन होते. त्याप्रमाणे करकोचा कांडेसर या पक्ष्याचेही तालुक्यामध्ये आगमन होत असल्याचे यापूर्वी आढळून आले आहे. मात्र, मध्यंतरी काही वर्ष या पक्ष्याचे थंडीच्या कालावधीमध्ये तालुका परिसरामध्ये वास्तव्य आढळले नव्हते.

करकोचा कांडेसर पक्ष्याला काही ठिकाणी कामऱ्या ढोक या नावानेही ओळखले जाते. या पक्ष्याची केवळ पांढरी मान आणि बाकी सर्व शरीर काळेकुळकुळीत अशी विचित्र मात्र, आकर्षक शरीराची रंगसंगती. गिधाडासारखा काहीसा दिसणारा असून हा पक्षी पाणथळी भागामध्ये बहुतांशवेळा वास्तव्याला आढळतो. थव्याने राहण्याऐवजी एकटाच राहण्याला त्याची पसंती असते.



> दुर्मिळ प्रजातींच्या पक्ष्यांचे तालुक्यात वास्तव्य असल्याचे अनेक वेळा स्पष्ट झाले आहे. येथील निसर्ग पक्ष्यांच्या वास्तव्याला अनुकूल असल्याचे त्यातून स्पष्ट होत आहे. करकोचा-कांडेसर हा स्थलांतरित पक्षी काही वर्षांनंतर पुन्हा एकदा तालुक्यामध्ये आढळला आहे. पर्यावरणीय स्थिती त्याच्या वास्तव्याला अनुकूल नसल्याने गेली २ वर्षे तो आढळला नसावा.
> - धनंजय मराठे, पक्षीमित्र

# ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचे पडघम

**। राजापूर । वृत्तसंस्था ।**
तालुक्यातील गेल्या काही महिन्यांपासून प्रशासकीय राजवट असलेल्या १० ग्रामपंचायतींच्या मे महिन्यामध्ये निवडणुका होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर पूर्वतयारी सुरू झाली आहे. त्यामुळे नव्या वर्षामध्ये निवडणुकीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापणार आहे.

मे महिन्यात होऊ घातलेल्या तालुक्यातील दहा ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील राजकारण ढवळून निघणार आहे. तालुक्यातील सागवे, आंगले, देवाचेगोठणे, वडदहसोळ, कोंड्येतर्फ सौंदळ, भालावली, केळवली, राजवाडी, मोगरे, मूर या पंचायतीच्या निवडणुकीमध्ये वर्चस्व मिळविण्याच्यादृष्टीने राजकीय पक्षांसह स्थानिक नेत्यांकडून जोरदार मोर्चेबांधणी आणि पूर्वतयारी सुरू आहे. मतदारांच्या भेटीगाठींसह प्रलंबित असलेल्या विकासकामांना चालना देणे आणि उमेदवारांचा शोध घेण्यावर राजकीय पक्षांनी शुभारंभ केल्याचे चित्र दिसत आहे.

गेल्या काही महिन्यांमध्ये ग्रामपंचायतींच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये महिलांसाठी राखीव असलेल्या अनेक जागांवर महिला उमेदवार इच्छुक नसल्याचे चित्र दिसले. त्यामुळे या जागांच्या फेरपोटनिवडणुका घ्याव्या लागल्या आहेत. त्यामुळे मे महिन्यात होवू घातलेल्या या निवडणुकीच्या अनुषंगाने आतापासूनच महिला उमेदवारांचा शोध घेण्याचे आव्हान राजकीय पक्षांसमोर राहणार आहे.



# 'बा विठ्ठला, धाव पाव रे...' विठूरायाचरणी वारकऱ्यांची आर्त पुकार

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपाची झळ पुन्हा एकदा वारकऱ्यांना बसली आहे. कारण एकादशी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांसाठी उपलब्ध असणारी एसटी सध्या आगारात ध्यानस्त झाली आहे. यामुळे विठूरायाच्या माघी एकादशी उत्सवासाठी वारकऱ्यांना खासगी वाहनांचा पर्याय निवडावा लागला असून, अर्थातच तो खिशाला अतिरिक्त कात्री लावणार आहे.

यामुळे विठूराया आता तूच मध्यस्थी करून हा संप लवकरात लवकर संपव, अशी आर्त पुकार पंढरीनाथाठायी वारकरी वाहत आहेत.

महाराष्ट्राचे काशीक्षेत्र म्हणून नामख्यात असणाऱ्या पंढरपूर नगरीचे राणा विठ्ठल या दैवताच्या माघी एकादशी उत्सवासाठी सिंधुदुर्गामधून

## पंढरपूर वारी महागली

एसटीच्या १२५ गाड्या वारकऱ्यांसाठी सोडल्या जात होत्या. यातून एसटीला तब्बल ४८ लाखाचे उत्पन्न मिळत होते. यंदा मात्र एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे लाखो रुपयांचे उत्पन्न बुडाले आहे. वारकऱ्यांनी पायीवारीबरोबरच खासगी बस गाड्यांचा पर्याय निवडल्यामुळे जिल्ह्यातील वारकऱ्यांचा पंढरपूर प्रवास महागला आहे. राज्यातील एसटी महामंडळाच्या संपाला नोव्हेंबरपासून सुरुवात झाली. तब्बल ९० दिवसापेक्षा अधिक या संपाचा कालावधी लोटला आहे. राज्यातील काही आगारांमध्ये थोड्याफार एसटी बस सेवा सुरू झाली. जिल्ह्यातही काही प्रमुख मार्गावर एसटी बस गाड्या धावत आहे. मात्र एसटीचे जवळपास १४०० पेक्षा अधिक कर्मचारी अजूनही संपावर आहे.

सिंधुदुर्ग विभागातून माघी एकादशी उत्सवाला कोकणातून जाणारे पांडुरंगाचे भक्त मोठ्या प्रमाणात आहे. याचे कारण कार्तिकी एकादशीला कोकणात भातपीक घेतले जाते. त्यामुळे वारकरी फारशे कार्तिकी एकादशीला न जाता माघी एकादशीला मोठ्या संख्येने कोकणातील वारकरी पंढरपूरला विठुरायाच्या दर्शनासाठी जात असतात. गेल्या दोन वर्षापासून पंढरपूरची विठ्ठलाची यात्रा कोरोना कालावधीत बंद ठेवली होती. यंदा मात्र निर्बंध उठविले आहेत. त्यामुळे पांडुरंगाचे वारकरी मोठ्या संख्येने पंढरपूराकडे निघणार आहेत. मात्र, यंदा खाजगी प्रवासी गाड्या हा पर्याय निवडला आहे. पंढरपूरला जाण्यासाठी मिनीबससाठी यंदा १८ ते २० हजार रुपये मोजावे लागत आहेत. चाळीस सिटर बससाठी ३८ ते ४० तसेच मोठ्या बससाठी ५० हजार रुपये इतके भाडे आहे. पंढरपूरला जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात खाजगी बस गाड्या बुकिंग करण्यात आल्या आहेत.

> एसटी महामंडळाचा संप असल्याने यंदा आम्ही बसगाड्या उपलब्ध करून देऊ शकत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील वारकऱ्यांची निश्चितपणे गैरसोय होत आहे. संप असल्याने एसटीचे कर्मचारी सेवेत रुजू होत नाहीत. त्यामुळे एसटी बसगाड्या उपलब्ध असल्या, तरी चालक आणि वाहक नसल्याने नियमित वेळापत्रकच सुरू होऊ शकलेले नाही. त्यामुळे जादा गाड्या सोडणे शक्य नाही.
> - प्रकाश रसाळ, नियंत्रक, एसटी विभाग

# मोदींच्या विरोधात 'माफी मागो' आंदोलन

## * पंतप्रधानांनी असंवेदनशीलतेची हद्द पार केली * नाना पटोलेंचे प्रत्युत्तर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
महाराष्ट्र काँग्रेसने रेल्वेतून लोकांना युपी-बिहारला पाठवून तिकडे कोरोना पसरवला असा गंभीर आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकसभेत केला. त्यांच्या या आरोपाला उत्तर देताना 'मोदींनी असंवेदनशीलतेची हद्द पार केली' असे मत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नोंदविले आहे. याशिवाय मोदींच्या या वक्तव्यामुळे महाराष्ट्राचा अपमान झाल्याचे सांगत बुधवारपासून काँग्रेसतर्फे भाजपच्या प्रत्येक कार्यालयासमोर 'माफी मांगो' आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या आरोपानंतर देशभरातील आणि राज्यातील राजकारण चांगलेच तापलेले आहे. यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

नाना पटोले म्हणाले की, ज्यावेळी जागतिक आरोग्य संघटनेनं मार्गदर्शक तत्वे सुचवली होती, त्याचे पालन मोदींनी केले असते तर देशावर ही वेळ आली नव्हती. ही चूक त्यांनी मान्य करावी.

याशिवाय, राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा होते तेव्हा विरोधकांच्या आरोपांचे खंडन करून सरकारने काय केले हे सांगायचे असते. एकमेकांची खिल्ली उडवायची नसते. तातडीने लॉकडाऊन लावला तेव्हा हजारो लोकं चालत गेले, अनेकांचा जीव गेला. भाजपचे राज्यातील नेते समर्थन करत असतील तर ते महाराष्ट्र द्रोही असल्याचे पटोले म्हणाले. गुजरातमधून १ हजार ३३ श्रमिक ट्रेन सोडल्या तर महाराष्ट्रातून ८०० ट्रेन सोडल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. गुजरातमध्ये भूकंप आला तेव्हा महाराष्ट्राने सगळ्यात जास्त मदत केली.

> सध्या पाच राज्यांच्या निवडणुका सुरु आहेत आणि याचाच फायदा भाजपला घ्यायचा आहे, त्यामुळंच मोदींनी काँग्रेसवर कोरोना संसर्ग पसरवल्याचा आरोप केला आहे. कोरोना महामारीत महाराष्ट्र सरकारने अत्यंत चांगले काम केले असून, याची दखल खुद्द डब्लूएचओने घेतली. परंतु, मोदींना हे कौतुक दिसत नसावे. महामारीच्या काळात कोणत्याही पक्षानं राजकारण केले नाही.
> - खा. संजय राऊत

# महापौरांकडून मुंबई अनलॉकचे संकेत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
मुंबईतील कोरोना रुग्णांची संख्या घटल्याने आर्थिक राजधानी पुन्हा रुळावर येण्याची शक्यता वाढली आहे. तिसऱ्या लाटेत दररोज २० हजारांहून अधिक रुग्ण सापडत असताना हा आकडा आता एक हजारांच्या खाली आला आहे. त्यामुळे लवकरच मुंबई अनलॉक होण्याच्या वाटेवर आहे.

यासंदर्भात अतिरिक्त पालिका आयुक्तांनी माहिती दिली होती. त्यावर किशोरी पेडणेकर यांनी पत्रकार परिषदेत महत्वाचं वक्तव्य केले आहे. येत्या आठवड्यात मुंबईत १००% लसीकरण पूर्ण होईल. सध्या १५ ते १८ वयोगटातील प्रतिसाद कमी आहे, पण लवकरच त्याचीही पूर्तता होणार असल्याची माहिती महापौरांनी दिली. फेब्रुवारी शेवट पर्यंत अनलोकमध्ये आम्ही जाऊ, असं आयुक्त म्हणाले आहेत. लवकरच सगळं चालू होणं गरजेचं आहे.

पान १ वरुन

## शेकापचा हल्लाबोल

अलिबाग-रामराज-रोहा या अनेक वर्षे रखडलेल्या रस्त्याच्या कामाला शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील आणि तत्कालीन आमदार पंडित पाटील यांनी मंजुरी मिळवून आणली. मात्र, राजकारण करीत सदर रस्त्याच्या कामाला तत्कालीन सेना-युती सरकारने सुरुवात करुन दिली नाही. शेवटी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी युवक संघटनेने रस्त्यावर उतरत रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनाच्या तडाख्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने सदर रस्त्याचे काम सुरु करण्याचे आश्वासन मुख्य अभियंता सुखदेवे यांनी आंदोलनस्थळी येऊन दिले होते. त्यानुसार काही दिवसातच सदर रस्त्याचे काम सुरु करण्यात आले. त्यावेळी कसलाही संबंध नसलेल्या काही उपटसुंभांनी येऊन श्रेय लाटण्याचे केविलवाणे प्रयत्नदेखील केले. मात्र, पुन्हा एकदा हे काम रखडले आहे. अतिशय वाईट अवस्था झालेल्या या रस्त्यामुळे या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अपघातांमुळे अनेकांना प्राणदेखील गमवावे लागले, तर अनेकजण जखमीदेखील झाले. बाळंतपणासाठी या मार्गावरुन जाणाऱ्या आयाबहिणींना अतोनात यातनांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व प्रकारामुळे शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांचा संताप अनावर झाला आहे. त्यामुळे महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील आणि तालुका चिटणीस अनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकापक्षाच्या शिष्टमंडळाने लक्षवेधी इशारा देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर धडक दिली. मात्र, यावेळी कोणीही जबाबदार अधिकारी कार्यालयात उपस्थित नव्हते. त्यामुळे शिष्टमंडळाच्या संतापाचा पारा चढला. कसलेही जबाबदार उत्तर देऊ न शकणाऱ्या या कर्मचाऱ्यांना शेकापच्या नेत्यांनी खडेबोल सुनावत तातडीने वरिष्ठांना कार्यालयात बोलावण्याच्या सूचना केल्या. त्यावेळी चित्रलेखा पाटील, अनिल पाटील, सुधीर चेरकर, विक्रांत वार्डे, रमेश पाटील, जया तांबटकर, मधू ढेबे, मोहन धुमाळ, अरुण भगत यांनी सदर रस्त्याचे काम का रखडले आहे याचा जाब विचारला. यावेळी शेकापचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराने काम थांबवले असल्याचे सांगत ते पुन्हा सुरु करण्यासाठी पत्रव्यवहार करणार असल्याचे सांगितले. मात्र, संतप्त शिष्टमंडळाने कागदी घोडे न नाचविता तात्काळ काम सुरुच झाले पाहिजे, असे सुनावत कंत्राटदाराला संपर्क साधण्यास सांगितले. त्यावर मोबाईलवरुन कंत्राटदार आणि अभियंता डोंगरे यांच्यात संभाषण होऊन शिष्टमंडळाला लगेच काम सुरु करण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, काम त्वरित सुरु न झाल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

> **रखडलेले काम त्वरित सुरु न केल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना तसेच कंत्राटदाराला अद्दल घडवू.**
> **- सुधीर चेरकर, सरपंच, वरंडे ग्रामपंचायत**

## तिवरांची कत्तल करणारे अटकेत

करणाऱ्या आणि त्यांच्या करवित्या धन्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे. या मागणीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे चित्र दिवसभर होते. उशिरापर्यंत तिवरांची कत्तल करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या कारवाईबाबत अधिकारी वर्ग चकार शब्द काढण्यास तयार नव्हते, यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली होती.

अख्ख्या महाराष्ट्राचा लक्ष वेधून घेणारा विहूर गाव सध्या भूमाफियाबरोबर लढा देत आहे. विहूर येथील शतकापासून गुरचरण असलेली सर्व्हे न.२०/१ ही जागा नवाबाच्या नावे चुकीची फेरफार करून नोंद करण्यात आली. नवाबांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांच्या नावे नोंद होऊन त्या वारसांनी प्रथम सन २००३ साली काही भाग विकला व महाराष्ट्र सरकारच्या आदेशाचे उल्लंघन करून सरळ सरळ गुन्हा केला. ग्रामस्थांनी त्यावेळी सुध्दा शासनाकडे लेखी तक्रार दिली परंतु, नवाबाच्या आर्थिक बळापुढे प्रशासन झुकले व विरोध संपुष्टात आला. सन २०२१ मधे तैजून निसार हसोनजी यांनी बिन आकारी असलेल्या जमिनीचे खोट्या सहीचे अर्ज दाखल करून मोजणी केली, ग्रामस्थांनी सर्व तथ्य मांडूनसुध्दा त्यांच्या विरुद्ध खोटे गुन्हे दाखल करण्यात आले... एवढेच नाही तर ग्रामपंचायतीने आतापर्यंत जवळ जवळ ४५ तक्रार नोंदवले, प्रशासनाच्या चौकशी कामी आजपर्यंत त्या सर्व तक्रारी घिरट्या घालत आहेत. सहा महिन्यांपासून भूमाफिया जेसीबी व पोकलन मशीनच्या सहाय्याने तिवर झाडांची बेसुमार कत्तल करत आहे; परंतु महसूल व वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून फोटोसुद्धा घेतले नाही. उलट, लोकांना वेड्यात काढले जात आहे, की इथे तर काहीच दिसत नाही. पोलिसात बेकायदेशीर भराव व रात्रीच्या वेळी होत असलेले तिवड झाडांची कत्तल बाबत वेळोवेळी तक्रारी देऊनसुद्धा आजपर्यंत संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला नाही. परंतु, सोमवारी रात्री गावातील मच्छिमार इसरार पांगारकर हे समुद्रावर गेले असता त्या ठिकाणी त्यांना बेकायदेशीर हालचाली दिसल्या असता त्यांनी लगेच ग्रामस्थांना कळविले. घटनास्थळी गेल्यावर २० ते २५ जण तिवरांची झाडे कटर मशीनच्या सहाय्याने तोडत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्याठिकाणी मुरूड येथील जाहिद कादरी, विहूर येथील सुहेल मोदी, नबील मोदी व अलिखान शिकारी, मुनीम पंगारकर व इतर बॉडीगार्डने ग्रामस्थांना लाठी-दांडक्याचा धाक दाखवून अडवले, तसेच कोणीही पुढे येऊन फोटो काढल्यास ठार करू, अशी जीवे ठार मारण्याची धमकी दिली. याबाबत ग्रामस्थांनी त्यांना पोलीस ठाण्यात आणले असता, पोलीस निरीक्षकांनी चौकशी करून कारवाई करणार अशी टाळाटाळ केली. तिवरांची कत्तल करणारे कामगार व संबंधितांना पकडून देऊनसुद्धा फौजदारी कारवाई झाली नाही, याचे सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत आहे.

## १३ कोटी २५ लाखांचा निधी मंजूर

कोंडाळकरवाडी व बौद्धवाडीमध्ये नागरी व सार्वजनिक सोयी-सुविधा, विद्युतपुरवठा तसेच जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करणे या कामांकरिता ९ कोटी ३० लाख १६ हजार ५५२ रूपये निधीची तरतूद करण्यात आली आहे, असे एकूण १३ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णयही ८ फेब्रुवारी २०२२ रोजी निर्गमीत करण्यात आला आहे.

२२ व २३ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील तळीये, कोंडाळकरवाडी व बौद्धवाडी, केवनाळे व पोलादपूर तालुक्यातील साखर (सुतारवाडी) या गावांच्या तात्पुरत्या पुनर्वसनाचा प्रस्तावासही शासनाने मान्यता दिली असल्याने जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रस्तावित केल्यानुसार कंटेनर चौथरा तयार करणे, नळ पाणीपुरवठा योजना करणे तसेच रस्ते व ड्रेनेज लाईन तयार करणे इत्यादी कामांसाठी आवश्यक एकूण रु. ५५ लाख ५८ हजार ३८४ रूपये इतक्या निधीपैकी ५० टक्के म्हणजे एकूण रु. २५ लाख ७९ हजार १९२/- इतका निधी या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचाही ८ फेब्रुवारी रोजी दुसरा शासन निर्णय मदत व पुनर्वसन विभागाने निर्गमीत केलेला आहे.

# रोह्यातील हनुमंताच्या मंदिरासाठी कोटीची उड्डाणे

## पालकमंत्र्यांची मेहेरनजर, | शासकीय निधीचा चुराडा

। रोहा । प्रतिनिधी ।

रोह्यातील शंभर वर्षांहून जुन्या मारुती मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी राज्याच्या पर्यटन राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी प्रादेशिक पर्यटन योजनेतून एक कोटी सात लक्ष रुपयांचा निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देत असल्याची माहिती शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे. पण केवळ ६७५ चौरस फूट जागेवर होऊ घातलेल्या या मंदिरासाठी पालकमंत्र्यांनी केलेली कोटीची उड्डाणे ऐकून उपस्थित पत्रकारांचे डोळे विस्फारले आहेत.

रोहा शहराच्या विकासासाठी निधीची कमी कधीच पडली नाही. किंबहुना काही कोटी रुपयांचा निधी आणला नाही, तर कामच होणार नाही अशी रोह्यातील एकंदर परिस्थिती आहे. मागील पंधरा वीस वर्षांत कोट्यावधी रुपये डॉ. चिंतामणराव देशमुख शहर सभागृहाच्या उभारणी, दुरुस्ती, सुशोभीकरण या कामात खर्च झाले होते. सदर सभागृहाची २० कोटी रुपये खर्चून नव्याने उभारणी करण्यात येणार असल्याची घोषणा खा. सुनील तटकरे यांनी नुकतीच केली आहे. पण कोट्यावधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या सभागृहाची विल्हेवाट लावताना



मात्र जेमतेम चाळीस लाख रुपये शासन दरबारी जमा होणार आहेत.

रोह्याचा मुख्य चौक अशी ओळख असणाऱ्या राम मारुती चौकात उभ्या असलेल्या मारुती मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी एका खासगी आर्किटेक्टकडून प्राथमिक स्वरूपात डिझाइन तयार करण्यात आले आहे. जुन्या पद्धतीच्या या कौलारु मंदिरासाठी तीन टप्प्यात कौलारू कळसाचे काम होणार असून जीर्णोद्धार करताना मंदिराच्या बांधकामातील जुने दगड, लाकूड यांचा देखील पुनर्वापर होणार आहे.

मारुती मंदिराच्या एका भिंतीवर बाहेरच्या बाजूस असलेले स्वातंत्र्यवीर सावरकर, पांडुरंगशास्त्री आठवले आणि डॉ. चिंतामणराव देशमुख यांचे शिल्प सदर जागेवर जपले जाणार असून मंदिरातील हनुमंताची मूर्ती देखील हलवली जाणार नसल्याचे पालकमंत्री सांगितले आहे. शहरात शासकीय निधीतून होत असलेल्या विविध विकासकामांसाठी खासगी आर्किटेक्ट किंवा संस्था यांच्याकडून अहवाल तयार केले जातात. प्रकल्प अहवालाची किंमत जेवढी जास्त तेवढा जास्त मोबदला या खासगी मंडळींना देण्यात येतो. मारुती मंदिराचे डिझाइन तयार करणाऱ्या संबंधित आर्किटेक्टला देखील लाखो रुपयांची बिदागी याच एक कोटी सात लाख रुपयांमधूनच देण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे.

कोणत्याही धर्माची प्रार्थनास्थळे हा आस्थेचा आणि भावनेचा विषय आहे. त्याला विरोध नाही. पण भावनेच्या आणि आस्थेच्या आड शासकीय निधीचा किती चुराडा करायचा यावर देखील विचार होणे गरजेचे असल्याचे मत रोह्यातील सूज्ञ नागरिक व्यक्त करत आहेत.

# दूषित पाण्यामुळे मासे मृत्युमुखी

। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्यातील राणेचीवाडी गावाशेजारी असलेल्या धरण नदीतील पाणी दूषित झाले असून मासेही मृत अवस्थेत आढळून आले आहेत. गावाशेजारून वाहणाऱ्या नदीच्या पाण्याचा वापर येथील नागरिक उन्हाळी भाजीपाला पिकविण्यासाठी, पाळीव जनावरांना पिण्यासाठी देखील या पाण्याचा वापर केला जात होता. यांसह येथील आदिवासी बांधव या धरण नदीत जाळी फेकून मासेमारी करत असत. मासे विक्रीतून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविला जात होता. सोमवारी काही शेतकरी आपल्या गुरांना पाणी पाजण्यासाठी नदीवर गेले होते. परंतु त्याठिकाणी गुरे पाणी पित नाहीत म्हणून त्यांनी नदीचे पाणी पाहिले असता त्यांना नदीचे पाणी गढूळ व त्यातील



मासे मृत्युमुखी पडले असल्याचे आढळून आले. नदीतील मासे पकडण्यासाठी रात्रीच्या वेळी कोणीतरी औषध टाकले असावे व त्यामुळेच नदीतील मासे मृत्युमुखी पडून पाणी गढूळ झाले असावे असा अंदाज ग्रामस्थांकडून लावला जात आहे. यामुळे नदीपात्रातील मासे मृत पावल्यामुळे आता येथील आदिवासी बांधवांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे हे कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

म ह त्वा चे

# मुरुड तहसीलमध्ये आधारकेंद्र सुरु




। मुरुड । वार्ताहर ।

मुरुड तहसील कार्यालयामध्ये आधारकार्ड केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. यामुळे नागरिकांची गैरसोय दूर झाली आहे. गेल्या अनेक महिन्यापासून आधारकार्ड केंद्र बंद असल्यामुळे सामान्य लोकांचे खूप हाल होत आहेत. बँक ऑफ इंडियामध्ये आधारकार्ड बनवायचे परंतु ही सेवा अल्प काळ ठरली व त्यांनी केंद्र बंद केले. याबाबत सामाजिक कार्यकर्ते जाहिद फकजी यांनी तहसील कार्यालयात आधारकार्ड केंद्र सुरु करण्याची मागणी केली. त्याची दखल घेत प्रशासनातर्फे हे आधारकार्ड केंद्र सुरु करण्यात आले आहे. तहसील कार्यालयालयातील जुनी पंचायत समितीमध्ये सी.एस.सी तहसील आधार केंद्र सुरु झाले आहे. सकाळी ११ ते सायंकाळी ४ पर्यंत लोकांना आधारकार्ड बनवण्याविषयीची सेवा देण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी या ठिकाणी संपर्क साधून आधारकार्ड विषयीच्या सर्व बाबींची पूर्तता करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ‘मुलांवर संस्कार ही काळाची गरज’

। नेरळ । वार्ताहर ।

लहान मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी आई म्हणून आपली स्वतःची आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी महिलांनी कुटुंबासाठी वेळ देखील द्यायला हवा असे आवाहन नेरळ पोलीस ठाण्याच्या उपनिरीक्षक माधुरी मुळीक यांनी केले. यावेळी मुळीक यांनी महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी दोन्ही कोर्सेस महत्वाचे असून त्या वर्गात सहभागी होऊन कोर्सेस पूर्ण करावेत आणि प्रमाणपत्र घेऊन स्वतः व्यवसाय सुरु करावे असे आवाहन केले. तर बालसंस्कार वर्ग हे भावी पिढी घडविण्यासाठी महत्त्वाचे



असेल आणि ते पाऊल संस्थेने उचलले आहे याबद्दल कौतुक केले.

नेरळ गावातील मोहाचीवाडी येथील गुरुचैतन्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि रणरागिणी महिला मंडळ या नोंदणीकृत संस्थेच्यावतीने महिलांसाठी दोन प्रशिक्षण कोर्सेस सुरु करण्याचा उपक्रम सुरु केला आहे. महिलांसाठी शिवणकला आणि ब्युटी पार्लर कोर्सेस सुरु करण्यात आले, त्यांचा शुभारंभ आयोजित कार्यक्रमात मुळीक यांचे हस्ते करण्यात आला. त्यावेळी सोनी जवादे, रेखा ठाकरे, मृणाल खेडकर, रंजना धुळे, स्नेहा गोगटे, स्वामींनी मांजरे, सुरेखा शितोळे, अश्विनी शेळके, वंदना मिश्रा, शिल्पा परदेशी, ज्ञानेश्वर भागात, संतोष भोईर, कैलाश खांगटे, सिराज शेख, वंदना भालेराव, संजय आदींसह असंख्य महिला उपस्थित होत्या.

# शिक्षण हक्क कार्यशाळा सुरु

। पनवेल । वार्ताहर ।

शिक्षण हक्क सभा, राष्ट्र सेवा दल रायगड आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्था बांधनवाडी यांच्या वतीने ६ फेब्रुवारी रोजी मधु-प्रमिला दंडवते संकुल, बांधनवाडी येथे एक दिवसीय शिक्षण हक्क कायदा व त्यातील तरतुदी या विषयावर प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. रमेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यशाळेत शरद जावडेकर, संतोष ठाकूर, सुरेश रासम,सुरेखा खैरे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

# ५० रिक्षाचालकांची कर्करोग तपासणी

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नुकत्याच साजऱ्या झालेल्या जागतिक कर्करोग दिनानिमित्त तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेन्टरतर्फे नवी मुंबईतील तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेन्टरतर्फे मोफत कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबीरात ५० रिक्षाचालकांची मोफत कर्करोग तपासणी करण्यात आली. या शिबीरात तोंडाच्या कर्करोगाची तपासणी, डायबिटीस, उच्च




रक्तदाब तसेच दातांची तपासणी करण्यात आली. तसेच तंबाखुजन्य पदार्थांचे व्यसन सोडण्यासाठी तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे समुपदेशन करण्यात आले.

# पालीत कृषी प्रदर्शन विक्री मेळावा

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेअंतर्गत ‘विकेल ते पिकेल’ या धोरणांतर्गत संत शिरोमणी रयत बाजार अभियान अंतर्गत तालुकास्तरीय कृषी प्रदर्शन व विक्री मेळावा आयोजित करण्यात आला. विक्री मेळाव्यात काळा तांदूळ, लाल तांदूळ, मूग, मटकी, चवळी, पालेभाज्या, ओली हळद, कनगर, विविध फळांचे क्रश इ. शेतमाल विक्री करीता होता. या मेळाव्यात योगेश लांगी, कल्याणी गुरव, मयूर पाशीलकर, मारुती हिलम आदी शेतकऱ्यांनी त्यांचा शेतमाल विक्री करीता प्रदर्शनात ठेवला होता.



चिरनेर गावातील अजय मोकल या तरुणाने रांगोळीद्वारे लतादीदींचे हुबेहूब चित्र रेखाटून अनोखी श्रद्धांजली वाहिली.

# रमाबाई आंबेडकर यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील शांतीनगर डिकसळ येथे त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. रमाबाई महिला मंडळाच्यावतीने १२४ वी जयंती निमित्ताने यांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. जयंतीचे औचित्य साधून माता मूर्तीची स्थापना भन्ते राहुल बोधी यांच्या हस्ते करण्यात आली.



याप्रसंगी प्रकाश गायकवाड, रमेश गायकवाड, रेखा साळवी, ज्योत्स्ना गायकवाड, कल्पना हिरे, पुष्पलता गायकवाड, अंजना गायकवाड, गुलाब गायकवाड, सुजाता गायकवाड, संगीता गायकवाड, शोभा चव्हाण, स्वाती फाळे, मोनिका साळोखे, भारती पाटील, सरिता शेळके, मीनाक्षी गायकर, वृषाली भोईर, पी एस गायकवाड, मधुकर रोकडे, हिराबाई हिरे, शारदा वाघमारे, काशिनाथ गायकवाड, शंकर हिरे, उल्हास जाधव, गुलाब शिंदे, सुभाष गायकवाड, हरिश्चंद्र यादव, धर्मेंद्र मोरे, सुनील गायकवाड, निखिल गायकवाड, नितीन गायकवाड, मधुकर गायकवाड, अशोक गायकवाड रुपेश गायकवाड, मनोज गायकवाड, राजू चव्हाण, सचिन गायकवाड, अनंता भोईर, प्रशिक गायकवाड, तेजस हिरे, अजिंक्य हिरे, प्रफुल फाले, अँड उत्तम गायकवाड, किशोर गायकवाड उपस्थित होते. मंडळाच्या रेखा गायकवाड यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले.

# मापगांव येथे महिलांसाठी प्रशिक्षण शिबीर

। सोगांव । वार्ताहर ।

मापगांव येथे १५ वर्षांवरील मुली व महिलांसाठी पर्स व चायनिज पदार्थ तयार करण्याचे सहा दिवस मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन युवा पुरोगामी सामाजिक संस्था परहूरपाडा-अलिबाग यांच्यामार्फत करण्यात आले होते. शिबीरात एकूण ६० मुली व महिलांनी सहभाग घेतला होता, शिबिराची सांगता रविवारी करण्यात आली. यावेळी सुनील थळे, हेमंत घरत, विवेक जोशी, संजय शिंदे, उनिता थळे, अनिता शिंदे, चंद्रकात खोत, सानिका घाडी, स्नेहा रुत, शलाका थळे, सुचित थळे, मीना पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. आभार संजय शिंदे यांनी मानले.



# वसुधा सोसायटी विरोधात ग्रामस्थांचे उपोषण



। सुधागड-पाली। वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील वसुधा सामाजिक उन्नती वनीकरण व वृक्षलागवड संस्थेने वाफेघर व विडसई गावकऱ्यांचे सर्व बंद केलेले रस्ते खुले करावेत, गुरांचे पाणवठ्यावर जाण्याचे व उभे राहण्याची ठिकाण खुली करावीत, तसेच या ठिकाणी होत असलेले अनधिकृत आरसीसी बांधकाम थांबवावे या मागण्या वाफेघर व विडसईतील काही ग्रामस्थांच्या आहेत. त्या पूर्ण होण्यासाठी सुधीर वाघमारे हे ग्रामस्थ सोमवारी (ता.७) पाली तहसील कार्यालयाबाहेर उपोषणास बसले आहेत.

सुधा संस्थेकडून शासन आदेश व नियमांचे वारंवार उल्लंघन होत आहे. ग्रामस्थांनी येथील अनधिकृत बांधकामा सबंधी १० ऑगस्ट २१ रोजी पाली तहसीलकार्यालयाबाहेर आमरण उपोषण केले होते. या आंदोलनाची दखल घेऊन पाली तहसीलदार यांनी कारवाई करून संस्थेचे अनधिकृत बांधकाम पाडले होते. मात्र प्रशासनाच्या या कारवाईनंतर देखील संस्थेने पुन्हा त्याच ठिकाणी अनधिकृत बांधकाम चालू केलेले आहे. संस्थेने यासंदर्भात शासनाच्या विरोधात उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका दाखल केलेली आहे.

उच्च न्यायालयात ही याचिका अजून प्रलंबित आहे. त्याचा निकाल लागलेला नसताना संस्था बांधकाम चालू ठेऊन उच्च न्यायालयाचा अवमान करीत असल्याचे उपोषण कर्त्यांचे म्हणणे आहे. उपोषणावेळी सुधीर वाघमारे यांच्या समवेत राजेश वाघमारे, अॅड. अमोल कांबळे व गणेश चव्हाण आदींसह विडसई व वाफेघर ग्रामस्थ उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी
पाहिजेत स्टाफ नर्स जन्नावार हॉस्पिटल, बाय पास रोड चेंढरे, अलिबाग. ९४२३८९०३१०
जाहिरातीसाठी संपर्क
(०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# महाशिवरात्री महोत्सवास प्रारंभ

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन शहरात श्री शंकराचे स्वयंभूस्थान तसेच जागृत दैवत समजल्या जाणाऱ्या जीवनेश्वर देवस्थान येथे ०७ फेब्रुवारी पासून महाशिवरात्री महोत्सवास प्रारंभ झाला. शहरातील उद्योजक कै. भाई मापुस्कर यांच्या पुढाकाराने व स्थानिकांच्या सहाय्याने सन १९७७ साली या मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला. मंदिरात नवरात्र उत्सव, शिमगा, होळी उत्सव साजरे केले जातात. माघ शु ॥ रथसप्तमी ते दर्शअमावस्या या कालावधीत सुरू होते असलेल्या महाशिवरात्री महोत्सवास प्रारंभ झाला असुन मंदिरातील पंचकमिटी संपूर्ण गावात भिक्षा प्रारंभ काढून महाप्रसादासाठी धनधान्य जमा करण्यास सुरुवात केली.

# कुसुंबळे आदिवासीवाडी येथे विविध स्पर्धा

## संस्थापिका जिविता पाटील यांच्या स्तुत्य उपक्रम

। अलिबाग। विशेष प्रतिनिधी।

तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाऊंडेशन अलिबाग रायगड तसेच नवयुवक माघी गणेशोत्सव मंडळ कुसुंबळे आदिवासीवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने नागेश सावंत यांच्या स्मरणार्थ त्यांचे पुत्र निलेश सावंत तसेच किरण सावंत व मातोश्री गीता सावंत यांच्या सहकार्याने कुसुंबळे आदिवासीवाडी येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी स्पर्धेचे आयोजक तेजस्विनी फाऊंडेशनचे पदाधिकारी धीरज पाटील, चिराग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी महिला, मुली व मुले यांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या ज्यामध्ये



महिलांनी व मुलांनी उत्सुकतेने सहभाग घेवून आनंद व्यक्त केला. संस्थेच्या संस्थापिका यांनी यावेळी फाऊंडेशनच्या माध्यमातून गृहिणींना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल व त्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांचा आदर केला जाईल व कधीही घराबाहेर न पडणाऱ्या स्त्रियांना संस्थेच्या माध्यमातून संधी देवून त्यांची कला सादर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. तसेच विधवा, निराधार, गरीब गरजू व कुमारी माता यांना स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे राहण्यासाठी संस्था कार्यरत राहील असे मत यावेळी व्यक्त केले.

याप्रसंगी सदरील स्पर्धांचे प्रायोजक गीता नागेश सावंत, निलेश सावंत, किरण सावंत, मंदाकिनी दीपक पाटील, भाग्यश्री तांडेल, चिराग पाटील, श्वेता पाटील, दिलीप मोकल, देवेंद्र केळुस्कर, निलेश थळे, समीर पाटील, अमोल पाटील, सिद्धार्थ वावेकर, गौरव वावेकर, ओमकार पाटील, प्रणित कोठेकर, नवजित म्हात्रे, अमोल पाटील, ऋषिकेश पाटील, कल्पेश म्हात्रे, महेश पाटील, उदय वावेकर, जयदीप म्हात्रे, रोशन पाटील, निता पाटील, तृप्ती पाटील, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवेंद्र केळुस्कर यांनी तर आभार प्रदर्शन जिविता पाटील यांनी केले.

# सोनगिरीवर भगवा ध्वज फडकला

। पाताळगंगा । वार्ताहर ।

कर्जत खालापूर हद्दीच्या मध्यभागी असलेला सोनगिरी किल्ला. खोपोलीहून पळसदरी कर्जतकडे जाताना अगदी सहज नजरेस पडणारा हा किल्ला कायमच दुर्लक्षित राहिल्याचे चित्र आहे. तर संवर्धनाच्या प्रतीक्षेत असलेल्या सोनगिरी किल्ल्यावर वेध सह्याद्रीच्या बीडखुर्द जांबरुंग पंचक्रोशी विभागामार्फत स्थानिक रहिवासी व सहकारी संस्था यांच्या सहकार्याने भव्य भगव्या ध्वजाचे अनावरण करण्यात आले. सोनगिरी किल्ल्यावर पूर्वी असलेला ध्वज कमकुवत झाला होता. त्यावर कायमस्वरूपी उपाय योजना करत भक्कम ३३ फुटी ध्वजस्तंभ किल्ल्यावर लावण्यात आला.

# ‘भाताचे कोठार’ शेतीअभावी रिते

## उद्योग तसेच नागरीकरणात वाढ, ११ हजारपैकी फक्त अडीच हजार हेक्टरवर लागवड

। उरण । वार्ताहर ।

पन्नास वर्षांपूर्वी उरण तालुका हा भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता. त्यानंतर येथे अनेक उद्योग तसेच नागरीकरण वाढत गेल्याने हळूहळू भातशेतीचे क्षेत्र कमी होत गेले. आता तालुक्यात ११ हजार हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी फक्त दोन हजार सेक्टरवर भात व इतर पीक घेतले जात आहेत. ज्या वेगाने शेती क्षेत्र घटत आहे, त्यावरून पुढील काळात तालुक्यात भातशेती संपणार असल्याचे दिसत आहे.

उरण तालुक्यातील शेतीचे एकूण क्षेत्र हे ११ हजार ३८ हेक्टर असून यापैकी सध्या



केवळ २ हजार ५४२ हेक्टर जमिनीवरच शेतीपीक घेतली जातात. यात १६७ हेक्टर आंबा व १५६ हेक्टर जमिनीत रब्बीचे पीक घेतले जात असून उर्वरित क्षेत्रावर भातपीक घेतले जात असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

उरण तालुक्यात परंपरागत भातशेती आणि तीही केवळ पावसावर अवलंबून असलेली एक शेती केली जात आहे. येथील नागरिकांचे उत्पन्नाचे साधन हे शेती हेच होते. शेतीची लागवड करून ते पिकल्यानंतर त्याची विक्री करून घर व इतर खर्च भागविणे हीच पद्धत होती. त्यामुळे शेतीवर अधिक भर दिला जात होता. एकराला दोन ते तीन खंडी भात पिकवला जात होता. त्यासाठी जोडीने होती. त्यामुळे खतांशिवाय इतर कोणताही खर्च नव्हता. शिवाय भात झोडणीनंतर तयार झालेल्या पेढ्यांचीही विक्री केली जात

> उरण तालुक्यातील एकूण १६ हजार ८४७ हेक्टर क्षेत्र यातील खारफुटी व मिठागरांची जमीन वगळता बहुतेक ठिकाणी भातशेतीच केली जात होती.
> –भाऊसाहेब अंधारे तहसीलदार उरण

होती. उरण तालुक्यात शेती हाच मुख्य व्यवसाय असल्याने उरण तालुक्यात दरवर्षी विक्रमी भाताचे पीक येत होते. भाताच्या याच पिकावर बारा बलुतेदारी पद्धतीने भाजी, मासळी आदीची खरेदी केली जात असल्याची तसेच अनेकांची लग्ने ही भाताच्या विक्रीतून केली जात होती, अशी माहिती ज्येष्ठ नागरिक तुळशीराम पाटील यांनी दिली.

### औद्योगिक शहराची नवी ओळख

भाताच्या साठवणुकीसाठी प्रत्येकाच्या घरात स्वतंत्र जागा होती. अशा या भात पिकाच्या उत्पन्नावर आधारित जीवनशैलीत पन्नास वर्षांपूर्वी आलेल्या औद्योगिकीकरण खासकरून सिडकोमुळे बदल झाले आहेत. उरणमधील पश्चिम विभागात मोठ्याप्रमाणात उद्योगांची उभारणी झाली आहे. तर पूर्व विभागातही उद्योगनिर्मिती होत असल्याने भातशेती नष्ट होऊ लागली आहे. त्यामुळे भाताचे कोठार म्हणून परिचित असलेल्या उरणची ओळख आता औद्योगिक शहर म्हणून होत आहे.

# शेकापच्या माध्यमातूनच सोनखार-उर्णोली रस्ता



**। पेण । वार्ताहर ।**

तालुक्यातील सोनखार उर्णोली रस्ता हा शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातूनच झाल्याची माहिती माजी सरपंच काशिनाथ पाटील यांनी प्रसारमाध्यमांसह संवाद साधताना दिली आहे. तसेच शेतकरी कामगार पक्षाच्या कामांचे श्रेय कुणीही चुकीच्या पद्धतीने घेण्याची सूचनाही त्यांनी दिली आहे.

सर्वसामान्यांचा कैवार घेणारा पक्ष विकासकामांमध्ये सदैव अग्रणी राहिला आहे. याच पार्श्वभूमीवर सोनखार ते उर्णोली रस्त्यासाठी स्वर्गीय माजी सभापती प्रमोद (पिंट्याशेठ) पाटील यांनी मार्च २०२१ च्या सुमारास जि. प. सेस फंडातून १९ लाख ८१ हजार ७३४ रुपये निधीची तरतुद केली होती. आणि पिंट्याशेठ पाटीलांच्या प्रयत्नानेच सोनखार ते उर्णोलीसाठी निधी आला होता.

परंतु काही राजकीय मंडळी स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी सर्वसामान्यांना चुकीची माहिती देत आहेत. यानुषंगाने शेतकरी कामगार पक्षाने केलेल्या निधीची तरतुद आपणच केली आहे, असे चित्र उभे करत आहेत.

मात्र, शेतकरी कामगार पक्षाने केलेल्या कामाचे श्रेय आम्ही कोणाला घेऊ देणार नसल्याचे मत शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा जोहे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच काशिनाथ पाटील यांनी प्रसार माध्यमांसमोर मांडले आहे.

## काशिनाथ पाटील यांची माहिती

प्र.मा./जा.क्र राजिप/प्रशाम आ./पी.बी.-४/५३५/२०२०-२१ दि. ०४/०३/२०२१ करार क्रमांक बी-१/ ९४ नुसार सोनखार उर्णोली रस्त्याचे कार्यारंभ आदेश मे. रामेश्वर कन्ट्रकन्शन प्रो. राजु सत्यनारायण पिचीका लोकमान्य हौ.सौ. पेण यांच्या नावे दि. ११ मे २०२१ रोजी काढण्यात आले असून, त्यानुसारच सदरचे काम सुरु असल्याची माहिती काशिनाथ पाटील यांनी प्रसारमाध्यमांना दिली आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकार चा उपक्रम)

**ई-निविदा**

**सं.: केआरकेडब्ल्यू-ईएल-टीआरडीएमसी-टी१-२०२१-आरटी१ दि. ०९/०२/२०२२**

कर्नाटक राज्यातील कारवार क्षेत्रांतर्गत कोंकण रेल्वे मार्गावरील ठोकूर ते कारवार विभागातील २५ केवी एसी ओव्हर हेड उपकरणे (ओएचई) आणि वीज पुरवठा प्रतिष्ठान (पीएसआय) च्या देखभालीच्या कामासाठी मनुष्यबळाच्या आउटसोर्सिंगकरिता अनुभवी कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. **कामाचा खर्चः** ₹ ११५.८६ लाख (जीएसटी वगळून). **बोली जमा करण्याची शेवटची तारीख व वेळः ०३/०३/२०२२ रोजी १५.०० वा.** अधिक माहितीसाठी संकेतस्थळः **www.ireps.gov.in** वर संपर्क साधा.



## नगरपरिषद खोपोली, जिल्हा- रायगड

जा.क्र.केएमसी/प.वि./ ८०५/२०२२
दिनांक :- ०३-०२-२०२२

**निविदा सूचना क्र. ०५/२०२१-२२**

मुख्याधिकारी, नगर परिषद खोपोली, जिल्हा रायगड यांच्यावतीने खालील नमूद कामांकरिता ऑनलाईन पद्धतीने २ लिफाफा पद्धतीने सिलबंद ई-निविदा, ई-निविदा सूचना नुसार महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग अनुज्ञापक मंडळ अंतर्गत विद्युत ठेकेदारांना अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र असलेल्या तसेच निविदेतील अटी व शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक पात्रता पूर्ण करणाऱ्या कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. सदर कामांची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीनेच सादर करावयाची आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०३-०२-२०२२ ला सायंकाळी ६.०० वाजेपासून पाहण्यास उपलब्ध राहील. कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | अंदाजपत्रकीय किंमत | अनामत रक्कम | कोरे निविदा पत्राची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | खोपोली नगरपरिषद हद्दीमध्ये वरची खोपोली दत्तमंदिर ते टाटागेटपर्यंत रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये येत असलेले विद्युत पोल व वाहिनी, फिडर पिलर बॉक्स स्थलांतरीत करुन भूमिगत केबलद्वारे जोडणे. | २२८९८३६/- | २३०००/- | २५००/- | ६० दिवस |

**ई-निविदा प्रसिद्धीचा तपशील**

| | |
|---|---|
| ऑनलाईन ई-निविदा प्रसिद्धी | दिनांक ०३-०२-२०२२ वेळ सायं. ६.०० वाजता |
| ई-निविदा दस्तऐवज डाऊनलोड व दाखल करण्याचा कालावधी | दिनांक ०३-०२-२०२२ वेळ सायं. ६.०० वाजेपासून ते दिनांक १०-०२-२०२२ वेळ दु. १.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ११-०२-२०२२ वेळ दु. १.०० वाजता |

**अटी व शर्ती :-**

१) ई-निविदेच्या अटी व शर्ती, सविस्तर ई-निविदा सूचना तसेच ई-निविदेची पुढील सर्व कार्यवाही व शुद्धीपत्रके महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

दिनांक :- ०३-०२-२०२२

सही/-
**(अनुप दुरे)**
मुख्याधिकारी
नगरपरिषद खोपोली



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
## विभाग, माणगांव
## ई-निविदा सुचना क्र.०२ सन २०२१-२०२२
## (दुबार मागणी)

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत देवन्हावे पाणी पुरवठा योजना ता.खालापूर जि.रायगड या कामाची निविदा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगांव यांचेकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रू.५९६.८८ लक्ष असून या कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि.०९/०२/२०२२ पासून www.mahatender.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

दिनांक- ०४/०२/२०२२

सही/-
**(व्ही.के.सुर्यवंशी)**
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग माणगांव



## जाहीर सूचना

खालापूर पोलीस ठाणे कॉ.गु.रजि.नं.१७०/२०२१, भा.द.वि.कलम २८५ सह जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३,७,१० व दि. महाराष्ट्र सॉल्व्हंट, रॅफीनेट अ‍ॅण्ड स्लॉप (अनुज्ञापन) आदेश सन २००७ चे कलम ३, १४, प्रमाणे या गुन्ह्यात एकूण २,६६,०००/-रु. किंमतीचे २०० लीटर मापाच्या लोखंडी पत्र्याचे एकूण १६० ड्रममध्ये एकूण ३२,०००/- लिटर स्क्रॅप कलर मटेरियल व २०० लिटर मापाच्या लोखंडी पत्र्याचे एकूण ३७ ड्रममध्ये एकूण ७,४०० लिटर बेसकोट कलर मटेरियल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडील क्र. पुरवठा/कात-१२/खालापूर/१७०/२०२१/३९७८, दि. ०७-१२-२०२१ अन्वये सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल शासन जमा करण्यात येत असल्याचे कळवून मुद्देमाल जाहीर प्रक्रियेद्वारे विक्री करणेबाबत आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने सदर गुन्ह्यातील नमुद जप्त मुद्देमाल रीतसर शासकीय नियमाप्रमाणे लिलाव करण्यात येणार आहे. तरी सदरबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड-अलिबाग कार्यालयाकडे संपर्क साधावा.

सही/-
**(दयानंद गावडे)**
**पोलीस निरीक्षक, स्था.गु.अ.शा.**
**रायगड-अलिबाग**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. गुलफाम अहमद समानी यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे मालक श्री. मुनीर मुसा खान व सौ. जाहीदा मुनीर खान यांचेकडून कायम मालकी हक्काअन्वये विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | चौरस मीटर | रुपये | पैसे |
| ९१ | २ | ०-५१-००<br>पो.ख.०-१०-००<br>एकूण ०-६१-०० | ३ | ०० |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहिवाट, बक्षीसपत्र, लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०९-०२-२०२२

पत्ता : ब्लॉक नं. १०३, बुरहान प्लाझा
कॉलेज रोड, आयुष नर्सिंग होम समोर
ममदापुर, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९०११५५५८०१

सही/-
**ॲड. अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकील उच्च न्यायालय)



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.लक्ष्मण गोविंद थळे रा.बामणगाव,ता.अलिबाग, जि.रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र(हे.आर.) | आकार(रू.पैसे) |
|---|---|---|---|
| बामणगाव ता.अलिबाग | २५२ | १-२१-७०<br>पो.ख.०-०३-८०<br>एकूण १-२५-७० | १२-१२ |

या मिळकतीपैकी विद्यमान मालक श्री.लक्ष्मण गोविंद थळे यांच्या मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीतील ०-३०-९० पो.ख ०-०३-८० हे.आर एकूण ०-३४-७० हे.आर.मिळकतीपैकी ०-१९-०० हे.आर.शेतजमिन मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स्, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक : ०८/०२/२०२२

सही/-
**ॲड.शैलेश प्रभाकर पाटील**
मु.खारगल्ली, धोबण तलावा शेजारी,
पो.नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली शेतजमिन मिळकत ही मिळकती समोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे अशिलांनी कायमखरेदी घेण्याबाबत करार केलेला आहे. सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्या प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-हमरापूर, ता.पेण, जि.रायगड**

| जमीन मालकाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १)नथुराम महादू पाटील<br>२)दत्तात्रेय महादू पाटील<br>३)वासुदेव महादू पाटील<br>४)रमाकांत महादू पाटील<br>५)सुमन महादू पाटील<br>६)निलेश विश्वनाथ पाटील<br>७)वैशाली विश्वनाथ पाटील<br>८)नितीन विश्वनाथ पाटील | ११६/२/१ | ००-६१-००<br>(वरील मिळकती पैकी श्री.नथुराम महादू पाटील यांचे हिश्याचे १२ गुंठे क्षेत्र वगळून)<br>उर्वरित ००-४९-०० हे.आर | १.२९ |
| १)बाळाराम दामोदर ठाकूर<br>२)संकेत रामचंद्र ठाकूर | ११७/२ | ००-२७-००<br>(वरील मिळकती पैकी श्री.बाळाराम दामोदर ठाकूर यांचे नावे असलेले क्षेत्रापैकी त्यांचा भाऊ श्री.दत्तात्रय दामोदर ठाकूर यांचे हिश्याचे ८ गुंठे क्षेत्र आणि श्री.संकेत रामचंद्र ठाकूर यांचे हिश्याचे ५ गुंठे क्षेत्र असे एकूण ००-१३-०० हे.आर.(बिनशेती) क्षेत्र) | २७०.०० |

तरी वरील मिळकतींचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, ॲटेचमेंट, लीन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यास लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदरच्या मिळकती या बोजाविरहीत आहेत, असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. व त्या आमचे अशिलांचे लाभामध्ये सोडून दिलेल्या आहेत असे समजण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

पेण.
दि.०८/०२/२०२२

सही/-
**श्री.नितीन हरिश्चंद्र पाटील**
ॲडव्होकेट
पाटील वाडा, महावीर मार्ग, पेण,
ता.पेण, जि.रायगड.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-टेकाळी, ता.अलिबाग, येथील गट नंबर २१५, एकूण क्षेत्र ०-४५-८० हे.आर., आकार ८.४३ रू.पै. पैकी क्षेत्र ०-२६-८० हे.आर. तसेच सदर मिळकतीतून १२ फूट रूंदीचे पश्चिमेकडून पोहोच रस्त्याचे क्षेत्र ही मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री.गणेश एकनाथ मढवी रा.मु.पो.आवास, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०८/०२/२०२२

**(ॲड.संजय द.म्हात्रे)**
सितास्मृती, आगरसुरे, पो.चोंढी
ता.अलिबाग, जि.रायगड



## अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
## जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्र. /२०२२ दि.

| अ. क्र. | अनुसूची | अनुसुची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/गाळा वगैरे | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नावे | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ११३७/०४६२७ | नवीन पोस्टाच्या बाजूला,अलिबाग | पहिला मजला,शॉप नं. ११४, बी विंग | मे मंदार एंटरप्रायझेसतर्फे भागीदार रमेश शांताराम काफरे | शिरीष हरिश्चंद्र मगर |
| २ | २ | १६००/३/४५३६ | ब्राह्मणआळी, अलिबाग | पहिला मजला,ब्लॉक नं. १०१, अे विंग | मे रसिका कन्स्ट्रक्शनतर्फे भागीदार जयंत मधुकर वाखारकर | सुषमा सुभाष तांबे |
| ३ | २ | १२९५अ/४०६९ | छत्रपती शिवजी चौक, अलिबाग | तळमजला, दुकान नं. ६ (०६) | सुदीप श्रीकृष्ण धर्माधिकारी | दलपत केशर सिंह, उम्मेद केशर सिंह |
| ४ | २ | १३९०/०१६४९ | ब्राह्मणआळी, अलिबाग | रेंज पहिलामजला, ब्लॉक नं.५(२०१), अे विंग | स्नेहल संदीप जोशी | मंदार विनायक गोडबोले वगैरे-२ |
| ५ | २ | १६००/१/४५३४, १६००/५/४५३८, १६००/८/४५४१, १६००/१३/४५४६ | ब्राह्मणआळी, अलिबाग | तळमजला,शॉप नं. ०१,पहिलामजला, ब्लॉक नं. १०३, दुसरामजला, ब्लॉक नं. २०३, चौथामजला,ब्लॉक नं. ४०२, अे विंग | मे. रसिका कन्स्ट्रक्शनतर्फे भागीदार जयंत मधुकर वाखारकर | संदीप यशवंत पराडकर |
| ६ | २ | १६००/३/४५४९ | ब्राह्मणआळी, अलिबाग | पहिलामजला,ब्लॉक नं.१०३,बी विंग | सदर | सुबोध प्रभाकर पाटील, अर्चना सुबोध पाटील |
| ७ | २ | ११३१/०१४०२ | मारुतीनाक्या जवळ, अलिबाग | दुसरामजला,ब्लॉक नं. २०२ | मे. कळसगिरी बिल्डर्स डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा.प्रसाद अनंत जोग | नागेश एम. कुलकर्णी |
| ८ | २ | १२९५अ/७/४२५९ | बालाजीनाक्या जवळ,अलिबाग | पहिलामजला,शॉप नं. १०४ | ममता मंगेश साळवी | अपर्णा योगेश भगत |
| ९ | २ | १३८७/०१६४८ | ब्राह्मणआळी, अलिबाग | दुसरामजला, ब्लॉक नं. १० (२०१) | मे कार्डिनल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स पार्टनर शिपफर्मतर्फे पार्टनर चंद्रशेखर वाय वागळे | निसार अहमद दाऊद दाऊदबा |
| १० | ३ | ७४/०१०९ | खोजनीनाक्या जवळ,अलिबाग | घर, | मुमताज बेगम सय्यद मीर हमजा | शाहीन तनवीर सारंग वगैरे-५ |
| ११ | २ | १४४७/०१७१४ | मारुतीनाक्या जवळ,अलिबाग | तळमजला,दुकान गाळा नं. १ (०१) व नं. २ (०२) | कोझेम सिराज कॉन्ट्रक्टर | निलोफर जुहेब दाते |
| १२ | २ | १६००/०४५४५ | ब्राह्मणआळी, अलिबाग | चौथामजला, ब्लॉक नं. ४०१,अे विंग | मे रसिका कंन्स्ट्रक्शनतर्फे भागीदार जयंत मधुकर वाखारकर तर्फे कबुलीजबाबाकरिता अखत्यारी अंकिता प्रकाश माळगे | आर्या अनिकेत कारेकर अनिकेत दिपक कारेकर |
| १३ | ३ | ४८/००८० | कोळीवाडा, बाजारपेठ, अलिबाग | घर | पांडुरंग बाबू सारंग | राजन पांडुरंग सारंग, केतन पांडुरंग सारंग |
| १४ | २ | ३७०/अ/०४५७ | ठिकरुळनाका, अलिबाग | तळमजला, व्यापारी गाळा नं. ४ (०३) | शब्बीर सालेहभाई माहिमवाला | अनघा आशिष भगत आशिष अशोक भगत |
| १५ | ३ | ३८५/३९४९,३८५/अ /०३९५० | इस्त्रायलगल्ली, अलिबाग | तळमजला-१, पहिलामजला-१०१, दुसरामजला-२०१, तळमजला-१ | अशोक दामोदर म्हात्रे वगैरे-७ | मंगेश दामोदर म्हात्रे |
| १६ | २ | १६१९अ/१९/४६६८ | ब्राह्मणआळी, अलिबाग | तळमजला शॉप नं. २० | मे सावित्री कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रा मुकेश बी जैन | संदेश सखाराम घरत, श्रृती संदेश घरत |
| १७ | २ | १३८७/१६४८ | ब्राह्मणआळी, अलिबाग | दुसरामजला, ब्लॉक नं.११ (२०२) | शमा रविंद्रनाथ वेदपाठक, रविंद्रनाथ गजानन वेदपाठक | शमा रविंद्रनाथ वेदपाठक |

**मुख्याधिकारी**
अलिबाग नगरपरिषद

